नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपूर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com



* वर्ष ५२ * अंक ५६ * * अकोला * | गुरुवार, दिनांक २८ ऑगस्ट २०२५ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

अग्रलेख

## खरीखरी..

## दीड तासात नागपूर ते गोंदिया

मुंबई ते नागपूर समृद्धी महामार्गाची सुरुवात करण्यात आली. तेव्हा राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या मार्गाने नऊ तासात मुंबईला जाता येईल असे जाहीर केले होते, ती बाब त्यावेळी अविश्वसनीय वाटावी अशी होती. सर्वाधिक वेग असलेल्या कोणत्याही अडथळ्यांशिवाय जाणाऱ्या दुरंतो गाडी पेक्षा कमी वेळामध्ये नागपूर ते मुंबईचा प्रवास होतो. एकूण प्रवास कसा होतो, हे आता अगदी सगळ्यांना स्पष्टपणे दिसू लागलेले आहे. रस्ते चांगले केले, आवश्यक त्या सुविधा केल्या, वाहन चालकांनी नियम पाळले तर प्रवास वेगाने होतो जलद होतो अपघात विरहित सुखरूप होतो. ज्याप्रमाणे नागपूर मुंबई विदर्भ एक्सप्रेस गोंदियापर्यंत पाठवण्यात आली त्याचप्रमाणे मुंबई नागपूर समृद्धी महामार्ग आता गोंदिया पर्यंत वाढवण्यात येणार आहे. नागपूर ते गोंदिया हे अंतर जवळजवळ १६२ किलोमीटरचे आहे हे अंतर कापण्यासाठी सध्याच्या घडीला तीन तास लागतात. समृद्धी महामार्गाची लांबी गोंदिया पर्यंत नेल्यास प्रस्तावित मार्ग १५ किलोमीटरने कमी होऊ शकतो, मार्गाचे अंतर कमी झाल्यावर वेळ वाचू शकतो. सर्वांच्या माहितीसाठी सांगायचे झाल्यास गोंदिया महाराष्ट्रातील छत्तीसगडला जोडणारा शेवटचा जिल्हा आहे. काल मंत्रिमंडळाच्या बैठकीत अनेक परियोजनांची घोषणा करण्यात आली त्यात पुणे नाशिक मार्ग, पुणे रिंग रोड मार्ग, कोकण एक्सप्रेस वे, नांदेड जालना एक्सप्रेस वे, शक्तीपीठ महामार्ग याच्याबरोबर आता नागपूर गोंदियाचा प्रवास कमी वेळात झाल्यावर जनतेचा वेळ वाचेल, खर्च वाचेल आणि महाराष्ट्राच्या शेवटच्या टोकापासून महाराष्ट्र राज्याच्या राजधानी पर्यंत प्रवास अगदी कमी वेळात पूर्ण करता येईल. सध्या समृद्धी महामार्गावर केलेल्या मानवी चुकांमुळे अपघात होत असतात. ठरलेल्या गतीने शिस्त पाळून वाहन चालकांनी शिस्तीत वाहने चालवली तर अपघात कमी होतील यामध्ये कुठलीच शंका नाही. या नव्या मार्गामुळे भंडारा आणि गोंदिया यासारख्या आदिवासी आणि दुर्लक्षित असलेल्या दुर्गम जिल्ह्यांना दनादन मुंबईला जाता येईल. सरकारच्या म्हणण्यानुसार यामुळे उद्योगांना प्रोत्साहन मिळेल सामाजिक आणि आर्थिक विकास होईल, त्यासोबतच इतरही अनेक फायदे होतील. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विदर्भाचा अनुशेष दूर करण्यासाठी आपली कंबर अगदी जबरदस्त पद्धतीने कसलेली आहे. आतापर्यंत पश्चिम महाराष्ट्र आणि विदर्भेतर पुढाऱ्यांच्या गतिमानतेमुळे विकासाची गंगा विदर्भाकडे सरकली नव्हती.

मात्र आता मा. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचे,

*रोड से रोड बनाते चलो, विकास की गंगा बहाते चलो*
*साथ मे आये जो जनता मेरी, उनको ही सुविधा दिलाते चलो,*

या पद्धतीचे काम अत्यंत उत्तम रीतीने सुरू आहे त्याबद्दल त्यांना धन्यवाद दिलेच पाहिजेत. कारण महाराष्ट्राच्या विकासात विदभार्चा मोठा वाटा आहे. वीज आपण उत्पादित करायची आणि त्याचा फायदा मुंबई पुण्याला मिळायचा. आता गडचिरोलीचे औद्योगीकरण आणि महामार्गाचे नवे नवे टप्पे विदर्भाच्या विकासाला नवीन गती देतील यात अजिबात शंका नाही.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# चार नक्षल्यांना कंठस्नान

तीन महिला सदस्यांचा समावेश

मोठा शस्त्रसाठा जप्त

■ महासागर प्रतिनिधी
गडचिरोली, दि. २७ :

गडचिरोली-नारायणपूर सीमेवरील कोपर्शी जंगल परिसरात आज सकाळी पोलीस व नक्षलींमध्ये झालेल्या चकमकीत चार जहाल नक्षलवादी ठार झाले. त्यामध्ये एक पुरुष व तीन महिलांचा समावेश आहे.

घटनास्थळावरून एसएलआर रायफल, दोन इन्सास रायफल व एक ३०३ रायफल पोलिसांनी जप्त केली. माहितीनुसार या परिसरात दोन दिवसापासून केंद्रीय समिती सदस्य सोनू उर्फ भूपती आणि कोसा हे दोघे सदस्यांसह ठाण मांडून बसले होते.

२५ आगस्ट रोजी छत्तीसगड सीमेवरील कोपर्शी घनदाट जंगल परिसरात गट्टा दलम, कंपनी क्रमांक १० व इतर नक्षलवादी बैठकीसाठी एकत्र आले होते. यात काही मोठ्या नेत्यांचा देखील समावेश होता. गडचिरोली पोलीस अधीक्षक निलोत्पल यांना ही गोपनीय माहिती मिळाल्यानंतर त्यांनी अपर अधीक्षक एम. रमेश यांच्या नेतृत्वात सी-६० च्या १९ आणि सीआरपीएफच्या तुकड्या अभियानासाठी रवाना केल्या.

कोपर्शी परिसरात मागील दोन दिवसापासून मुसळधार पाऊस सुरु असल्याने त्यापरिसरात पोहोचण्यासाठी पोलीस जवानांना दोन दिवस प्रतिकूल परिस्थितीचा सामना करावा लागला.



दरम्यान, २७ आगस्ट रोजी पहाटे ५ वाजताच्या सुमारास जंगलात दबा धरून बसलेला नक्षलवाद्यांनी पोलिसांच्या दिशेने जोरदार गोळीबार सुरू केला. यावेळी जवानांनी देखील चोख प्रत्युत्तर दिले. ही चकमक आठ तास चालली.

चकमकीनंतर परिसरात पोलिसांनी शोध घेतला असता चार नक्षलवाद्यांचे मृतदेह, शस्त्रसाठा व नक्षल साहित्य आढळून आले. यात तीन महिला व एक पुरुषाचा समावेश आहे. चकमक परिसर घनदाट जंगलाने वेढलेला असल्याने अजूनही काही नक्षलवादी लपून बसल्याची शक्यता आहे. त्यामुळे नक्षल विरोधी मोहीम अद्यापही सुरूच असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

गेल्या चार वर्षापासून गडचिरोली जिल्ह्यात नक्षलवाद्यांच्या हालचाली मर्यादित झाल्या आहे. चकमकीत अनेक नेते, सदस्य मारल्या गेल्याने आणि नवीन भरती बंद असल्याने जिल्ह्यात चळवळ कमकुवत झाली आहे. शेजारच्या छत्तीसगडमध्येही नक्षलविरोधी मोहीम तीव्र केल्याने नक्षलवाद्यांची कोंडी झाली आहे. यावर चर्चा करण्यासाठी कोपर्शीच्या जंगलात नक्षल चळवळीचा प्रभारी नेता तथा केंद्रीय समिती सदस्य भूपती आणि केदारी रेड्डी उर्फ कोसा त्याठिकाणी आले होती. अशी शक्यता आहे. या कारवाईनंतर नक्षलवाद्यांना मोठा धक्का बसल्याचे बोलले जात आहे.

## धापेवाडा शिवारात विजेचा कहर

## मायलेकासह तिघांचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी
सावनेर / कळमेश्वर, दि. २७ :

नागपूर जिल्ह्यातील धापेवाडा शिवारात आज दुपारच्या सुमारास विजेच्या प्रचंड कडकडाटासह झालेल्या प्रकोपात शेतात काम करणाऱ्या तिघांचा जागीच मृत्यू झाला. संजू सावजी हॉटेलच्या बाजूला घडलेल्या या हृदयद्रावक घटनेत ओम पाटील आणि त्याची आई वंदू पाटील तसेच निर्मला पराते यांचा मृत्यू झाला.



मृतक वंदू पाटील आणि ओम पाटील

दुपारी अचानक हवामानात बदल झाला. गडगडाटासह पाऊस सुरू झाला आणि शेतात काम करत असलेल्या या तिघांवर वीज कोसळली. या घटनेत तिघांचा जागीच मृत्यू झाला. सोबतच्या शेतकऱ्यांनी मदतीचा प्रयत्न केला, मात्र तोवर तिघांचा मृत्यू झाला होता.



मृतक निर्मला पराते

घटनेची माहिती मिळताच परिसरात मोठी खळबळ उडाली. हितज्योती फाउंडेशनचे हितेश दादा बनसोड आणि त्यांची चमू तात्काळ घटनास्थळी दाखल झाली. पोलीस अधिकारी सागर खर्डे, उमेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस पथकाने मदतकार्य सुरू केले. पंचनामा करून मृतदेह सावनेर येथील सरकारी रुग्णालयात हलविण्यात आले, जिथे तहसीलदार स्वतः उपस्थित राहून आवश्यक प्रक्रिया पार पाडण्यात आली.

या घटनेची गंभीर दखल घेत सावनेर उपविभागीय अधिकारी (एस.डी.पी.ओ.) घटनास्थळी दाखल झाले आणि संपूर्ण परिस्थितीचा आढावा घेतला. तसेच कळमेश्वरचे तहसीलदार विकास बिग्गड हेही घटनास्थळी पोहोचले. त्यांनी स्थानिक प्रशासनासोबत समन्वय साधून मदतकार्याची पाहणी केली.

या घटनेने संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे. शेतात कष्ट करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या या तिघांच्या मृत्यूमुळे त्यांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. घटनास्थळी भाजप नेते डॉ. राजीव पोतदार, मनोहर कुंभारे, रामराव मोवाडे, समाजसेवी विजय कापसे यांनी मृतकांच्या कुटुंबियांचे सांत्वन केले . मृतकाच्या कुटुंबीयांना तातडीने शासकीय मदत देण्याची मागणी केली आहे.

या घटनेत ठार झालेल्या वंदू पाटील यांच्या पतीचे सात महिन्यापुर्वी आजाराने निधन झाले होते . आता मायलेकाचाही मृत्यू झाला असून, वंदू पाटील यांची १६ वर्षीय मुलगी पोरकी झाली आहे . घटनेने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

## भूस्खलनातील मृतांची संख्या ३० वर

मृतांमध्ये बहुतेक भाविक : मृतांचा आकडा आणखी वाढण्याची शक्यता

■ वृत्तसंस्था, जम्मू, दि. २७ :

मंगळवारी जम्मूतील कटरा येथील वैष्णोदेवी धाम येथे अर्धकुमारीजवळ झालेल्या भूस्खलनातील मृतांची संख्या ३० वर पोहोचली आहे. एसएसपी रियासी परमवीर सिंह यांनी बुधवारी सकाळी ही माहिती दिली.

काल रात्री उशिरापर्यंत ७ जणांचा मृत्यू झाल्याचे वृत्त आहे. बचावकार्य सुरू आहे. मृतांचा आकडा वाढू शकतो. दरम्यान, खराब हवामानामुळे वैष्णोदेवी यात्रा पुढे ढकलण्यात आली आहे.

मंगळवारी, जम्मू शहरात २४ तासांपेक्षा कमी कालावधीत २५० मिमी पेक्षा जास्त पाऊस पडला. यामुळे अनेक ठिकाणी पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. घरे आणि शेतात पाणी शिरले आहे. भूस्खलनामुळे अनेक पूल आणि रस्ते खराब झाले आहेत.

३५०० हून अधिक लोकांना वाचवण्यात आले आणि सुरक्षित ठिकाणी नेण्यात आले. जिल्हा प्रशासन, पोलिस, एनडीआरएफ, एसडीआरएफ, भारतीय लष्कर बचाव कार्य करत आहेत.

उत्तर रेल्वेने जम्मू-कटरा येथून धावणाऱ्या आणि आज येथे थांबणाऱ्या २२ गाड्या रद्द केल्या आहेत. याशिवाय, २७ गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत. तथापि, कटरा-श्रीनगर दरम्यानची रेल्वे सेवा सुरूच आहे.

रद्द केलेल्या २२ गाड्यांपैकी ९ गाड्या कटरा (वैष्णोदेवी धामचा बेस कॅम्प) येथून आणि एक जम्मूहून होती. उर्वरित गाड्या कटरा, जम्मू आणि उधमपूर येथे पोहोचणार होत्या. दरम्यान, २७ गाड्या फिरोजपूर, मांडा, चक राखवाला आणि पठाणकोट येथे थांबविण्यात आल्या आहेत. पठाणकोट-कांगडा रेल्वे ट्रॅकवरही मुसळधार पाऊस आणि भूस्खलनाचा परिणाम झाला असून चक्की नदीला पूर आला आहे.

## ट्रम्प टॅरिफ लागू

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २७ :

अमेरिकेने भारतावर लावलेला २५% अतिरिक्त कर आज २७ ऑगस्टपासून लागू झाला आहे. आता भारतावरील एकूण कर ५०% झाला आहे.

अमेरिकेच्या शुल्काचा भार भारतावर, रशियन तेल खरेदी केल्याबद्दल शिक्षा, असे जगभरातील वृत्तपत्रांनी म्हटले आहे. सर्व भारतीय वस्तूंवर ५०% कर लादण्याची धमकी ट्रम्प यांनी प्रत्यक्षात आणली आहे.

यामुळे लाखो लोकांना रोजगार देणाऱ्या भारतीय निर्यातदारांचे मोठे नुकसान होईल. तसेच, जगातील दोन तृतीयांश मोठ्या अमेरिकन कंपन्यांचा व्यवसाय भारतात आहे. या शुल्कामुळे जगातील चौथ्या क्रमांकाच्या भारतातील शेअर बाजारातील अब्जावधी डॉलर्सची परदेशी गुंतवणूक अस्थिर होऊ शकते.

## गुजरातमधील बेनामी पक्षांना ४३०० कोटी रुपये कुठून आले?

राहुल गांधी यांचा सवाल



■ नवी दिल्ली, दि. २७ :

गुजरातमधील अज्ञात राजकीय पक्षांना मिळालेल्या ४३०० कोटी रुपयांच्या देणग्यांबाबत काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी बुधवारी निवडणूक आयोगाला प्रश्न विचारला. त्यांनी एक अहवाल शेअर केला आणि म्हटले की या १० पक्षांनी एवढी मोठी देणगी घेतली पण खर्च फक्त ३९ लाख रुपये दाखवला.

त्यांनी लिहिले, गुजरातमध्ये काही निनावी पक्ष आहेत ज्यांचे नाव कोणीही ऐकले नाही, परंतु त्यांना ४३०० कोटी रुपयांच्या देणग्या मिळाल्या.

या पक्षांनी फार कमी वेळा निवडणुका लढवल्या आहेत किंवा त्यावर खर्च केला आहे. हे हजारो कोटी कुठून आले? ते कोण चालवत आहे? आणि पैसे कुठे गेले? निवडणूक आयोग चौकशी करेल का की येथेही प्रतिज्ञापत्र मागवेल?

## ४ मजली इमारत कोसळली तिघांचा करुण अंत

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २७ :

मुंबईतील विरार परिसरात एक ४ मजली इमारत कोसळून वाढदिवस असणाऱ्या एका चिमुकलीसह तिच्या आईचा करुण अंत झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. या घटनेत ३ जणांचा बळी गेला आहे.

ढिगाऱ्याखाली चिमुकलीच्या वडिलांसह अजून २० ते २५ जण अडकल्याची शक्यता आहे. त्यामुळे मृत्युचा आकडा आणखी वाढण्याची शक्यता आहे.

विरारच्या नारंगी फाटा परिसरातील रमाबाई अपार्टमेंट या ४ मजली इमारतीचा मंगळवारी रात्री उशिरा एक भाग कोसळला. या दुर्घटनेत ३ जण ठार झाले. ही घटना घडली तेव्हा इमारतीच्या चौथ्या मजल्यावर राहणाऱ्या जोयल कुटुंबातील १ वर्षीय चिमुकलीचा वाढदिवस साजरा केला जात होता. पण अचानक इमारतीचा एक भाग कोसळल्यामुळे होत्याचे नव्हते झाले. त्यात बर्थडे गर्लसह तिची आई व अन्य एका व्यक्तीचा मृत्यू झाला.

## बाप्पाचे वाजतगाजत स्वागत



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २७ :

महाराष्ट्रासह संपूर्ण देशभरात आज गणेशोत्सवाची सुरुवात झाली आहे. सर्वत्र उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण असून, घरोघरी आणि गणेश मंडळांमध्ये गणपती बाप्पा विराजमान झाले आहेत. सध्या गणपतीच्या प्राणप्रतिष्ठापनेचा शुभ मुहूर्त आणि पूजा सुरू आहे.

फडणवीस म्हणाले, श्रीगणेश आपले आराध्य दैवत आहेत, ते विघ्नहर्ता आहेत. त्यामुळे आपल्या देशावर येणारे सर्व संकट दूर करण्यासाठी मी प्रार्थना करतो.

राज्याचे विधानपरिषद विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या संभाजीनगर येथील भवानी कृपा निवासस्थानी आज श्रींचे आगमन झाले. दानवे कुटुंबियांनी गणरायाची आरती करत आनंदात गणरायाचे आगमन घरात केले.

## ४०० विद्यार्थी आणि शिक्षक अडकले

### शाळेत भरले ५ फूट पाणी



■ वृत्तसंस्था, गुरूदासपूर, दि. २७ :

पंजाबमध्ये सततच्या पावसामुळे नद्या दुथडी भरून वाहत आहेत. धरणांमधून पाणी सोडल्यामुळे बुधवारी पठाणकोट, गुरुदासपूर, तरणतारन, होशियारपूर, कपूरथळा, फिरोजपूर आणि फाजिल्का येथे पूर आला.

गुरुदासपूरमधील डाबुरी येथील नवोदय विद्यालयात ४०० हून अधिक विद्यार्थी आणि शिक्षक पुरात अडकले आहेत. शाळेचा तळमजला ५ फूट पाण्याने भरला आहे. मुलांना पहिल्या मजल्यावर ठेवण्यात आले आहे.

विद्यार्थी आणि शिक्षकांना बाहेर काढण्यासाठी एनडीआरएफ आणि लष्कराच्या पथकांना पाठवण्यात आले आहे. राज्यात मुसळधार पावसामुळे सर्व शाळा ३० ऑगस्टपर्यंत बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

त्याच वेळी, रावी नदीतील पुरामुळे, कर्तारपूर साहिब कॉरिडॉरमध्येही ७ फूट पाण्याचा पूर आला आहे. यामुळे पाकिस्तानमधील श्री कर्तारपूर साहिब गुरुद्वारा देखील पाण्याखाली गेला आहे. लष्कराने हेलिकॉप्टरद्वारे २२ सीआरपीएफ जवान आणि तीन नागरिकांना वाचवले.

## लालबागच्या राजाच्या दर्शनासाठी भाविकांची तोबा गर्दी

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २७ :

आज राज्यात घरोघरी गणरायाचे आगमन झाले आहे. मुंबईतील लालबागच्या राजाच्या दर्शनासाठी भाविकांची प्रचंड गर्दी झाली आहे. या गर्दीचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून, त्यात भाविकांच्या लांबच लांब दर्शनासाठी उभ्या असलेल्या दिसत आहेत.

मुंबईतील गणेशोत्सवाची त्यातही लालबागच्या राजाच्या दर्शनासाठी येणाऱ्या गर्दीची जगभरात चर्चा होते. यंदाही लालबागच्या राजाच्या दर्शनासाठी मुंबईत प्रचंड गर्दी झाली आहे.

# मनोज जरांगे मुंबईच्या दिशेने रवाना

आझाद मैदानावर आंदोलनासाठी पोलिसांची परवानगी : सरकारकडून चर्चेचे आवाहन

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २७ :

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली आज आंतरवाली सराटी येथून मुंबईकडे भव्य मोर्चाची सुरुवात झाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मोर्चा पुढे ढकलावा म्हणून आपले विशेष कार्यकारी अधिकारी मनोज जरांगे यांच्याकडे पाठवले होते.

या माध्यमातून मुंबईत सण काळात आंदोलन होऊ नये, यासाठी समजूत घालण्याचा प्रयत्न झाला. मात्र, मनोज जरांगे यांनी मोर्चा २७ ऑगस्ट रोजीच निघणार असल्याचा ठाम निर्धार व्यक्त केला होता. दरम्यान, मुंबई पोलिसांनी जरांगे यांना आझाद मैदानावर आंदोलन करण्याची परवानगी दिली आहे. तत्पूर्वी हायकोर्टाने ही परवानगी नाकारल्याने मोठा वाद झाला होता.

**बेमुदत आंदोलन करणार**

जरांगे यांनी आज सकाळपासूनच मुंबईच्या दिशेने कूच केली आहे. त्यातच आता मुंबई पोलिसांनी मनोज जरांगे यांना आझाद मैदानावर आंदोलन करण्यासाठी सशर्त परवानगी दिली आहे. मात्र, ही परवानगी एका दिवसासाठी देण्यात आली आहे. यावर मनोज जरांगे यांनी प्रतिक्रिया दिली. आम्ही सर्व नियमांचे पालन करत आंदोलन करणार आहोत. परंतु, हे आंदोलन एक दिवसाचे नाही, तर बेमुदत असणार आहे. २९ ऑगस्ट रोजी मी उपोषणाला बसणार असल्याचे मनोज जरांगे यांनी ठामपणे सांगितले.



**जरांगेंनी तयारी दर्शवल्यास सरकार चर्चेला तयार - उदय सामंत**

मी मनोज जरांगे पाटलांची भेट घेण्याबाबत अजून ठरवलेले नाही. त्यांनी शासनाबरोबर चर्चा करायची तयारी दर्शवली, तर शासन देखील त्यांच्याबरोबर चर्चा करायला तयार आहे. त्यांच्या चर्चेसाठीच काल आम्ही उपसमितीची बैठक घेतली. जरांगे यांनी गैरसमज करून घेऊ नये. त्यांनी संयमाने सर्व गोष्टी हाताळाव्यात असे आवाहन मंत्री उदय सामंत यांनी केले.

दुसरीकडे, मनोज जरांगेंच्या विनंतीनुसार, सरकारने शिंदे समितीला मुदतवाढ दिली. मात्र, त्यांचा मोर्चा निघाल्यापासून त्यांच्याशी अजून कोणतीही चर्चा झाली नाही. शासनाला हा प्रश्न प्रतिष्ठेचा करायचा नाही. पूर्वीही केला नव्हता आणि आताही करायचा शासनाची भूमिका नाही, असे राधाकृष्ण विखे पाटील म्हणालेत.

**मनोज जरांगेंनी मोर्चाच्या तारखेचा पुनर्विचार करावा - योगेश कदम**

गणेशोत्सवादरम्यान मनोज जरांगेंनी काढलेल्या मराठा मोर्चाबद्दल मंत्री योगेश रामदास कदम म्हणाले, ?गणेशोत्सवानिमित्त दरवर्षी लाखो भाविक मुंबईत येतात. जर मराठा मोर्चा याच दिवशी आला तर त्यामुळे नागरिकांना मोठी गैरसोय होऊ शकते आणि पोलिसांवर मोठा दबाव येऊ शकतो. वैयक्तिकरित्या, मी मनोज जरांगे यांना तारखेचा पुनर्विचार करण्याची विनंती करेन.

# देशातील निम्म्या खासदार, आमदारांवर गुन्हेगारी खटले

महिलांविरुद्ध गुन्ह्यांच्या बाबतीत पश्चिम बंगाल आघाडीवर : आंध्र प्रदेश दुसऱ्या क्रमांकावर

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २७ :

केंद्र सरकारने नुकतेच संसदेत १३० वे संविधान दुरुस्ती विधेयक सादर केले आहे. या विधेयकात अशी तरतूद आहे की जर पंतप्रधान, मुख्यमंत्री किंवा मंत्री यांना फौजदारी प्रकरणात अटक झाली आणि ते ३० दिवस तुरुंगात राहिले तर त्यांना त्यांच्या पदावरून काढून टाकता येईल.

सध्याची परिस्थिती अशी आहे की देशभरातील ४५% आमदार आणि ४६% खासदारांवर गुन्हेगारी खटले दाखल आहेत. महिलांविरुद्धच्या गुन्ह्यांबद्दल बोलायचे झाले तर पश्चिम बंगाल अव्वल स्थानावर आहे. तर आंध्र प्रदेश दुसऱ्या स्थानी आहे.

देशभरात, ४५% आमदारांनी स्वतःविरुद्ध गुन्हेगारी खटले असल्याचे जाहीर केले आहे, तर २९% आमदारांवर गंभीर गुन्हे दाखल आहेत. आमदारांविरुद्ध गुन्हेगारी खटल्यांच्या बाबतीत आंध्र प्रदेश देशात पहिल्या क्रमांकावर आहे. त्यानंतर केरळ, तेलंगणा आणि बिहारचा क्रमांक लागतो.



निवडणूक सुधारणांसाठी काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थे असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स (एडीआर) च्या अहवालातून ही माहिती समोर आली आहे.

संसदेत हा आकडा काळानुसार वाढत आहे. २००९ मध्ये, ३०% खासदारांवर गुन्हेगारी खटले दाखल होते आणि १४% खासदारांवर गंभीर खटले दाखल होते. २०१४ मध्ये, खासदारांविरुद्ध गुन्हेगारी खटल्यांची संख्या एक तृतीयांश आणि गंभीर खटल्यांची संख्या एक पंचमांश झाली. २०१९ मध्ये, ४३% खासदारांवर गुन्हेगारी खटले होते आणि सुमारे २९% खासदारांवर गंभीर गुन्हे होते. २०२४ च्या निवडणुकीनंतर ही संख्या आणखी वाढली.

## कृत्रिम फुलांमुळे शेतकरी संकटात



■ **मुंबई :** राज्यात गणेशोत्सवाला सुरवात झाली आहे. घरगुती आणि सार्वजनिक गणेशोत्सव मंडळासाठी आरास व मखर तयार करण्याकरीता मोठ्या प्रमाणावर फुलांचा वापर केला जातो. मात्र, शेतकऱ्यांनी शेतात पिकविल्या नैसर्गिक फुलांऐवजी चीन मधून आयात केलेल्या प्लास्टिक अथवा सिंथेटिक पदार्थांपासून बनवलेली कृत्रिम फुले मोठ्या प्रमाणावर वापरली जात आहेत. हा वापर शेतकऱ्यांच्या आर्थिक ऊत्पन्नावर विपरीत परिणाम करणारा तर आहेच, परंतु पर्यावरणालाही हानीकारक आहे.

या पार्श्वभूमीवर कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या पुढाकाराने पर्यावरण, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास मंत्री पंकजा मुंडेंना यासंदर्भात पत्र देत कृत्रिम फुलांच्या वापरामुळे शेतकऱ्यांवर ओढवलेल्या आर्थिक संकटातून शेतकऱ्यांची सुटका करण्यासाठी, शेतकरी हितास्तव पर्यावरण विभागामार्फत आवश्यक कायदेशीर उपाययोजना करत कृत्रिम फुलांच्या वापरावर बंदी घालण्याची मागणी करण्यात आली आहे.

कृत्रिम फुलांच्या वापरामुळे फुल शेती धोक्यात येऊन शेतकरी आर्थिक संकटात सापडलेला आहे तसेच हरीतगृहे नष्ट होऊन शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होऊ लागले आहे. कृत्रिम फुले दिसायला आकर्षक असली, तरी त्यांचा पर्यावरणावर आणि स्थानिक अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम होत आहे. त्यामुळे याचं गांभीर्य लक्षात घेता शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी पुढाकार घेत पंकजा मुंडेंना पत्र लिहित कृत्रिम फुलांच्या विक्रीवर बंदी घालण्याची मागणी केली आहे.

## आमदार चित्रा वाघ यांचा मनोज जरांगेंवर पलटवार



■ **मुंबई :** भाजप नेत्या तथा आमदार चित्रा वाघ यांनी मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी केलेल्या टीकेला सडेतोड प्रत्युत्तर दिले आहे. मनोज जरांगे यांनी माझे गबाळे उचकण्याचा इशारा दिला आहे. त्यांनी काय उचकायचे ते उचकावे. मी कुणाच्या बापाला घाबरत नाही, असे त्यांनी म्हटले आहे.

मनोज जरांगे यांनी दोन दिवसांपूर्वी चित्रा वाघ यांच्यावर सडकून टीका केली होती. या पार्श्वभूमीवर चित्रा वाघ यांनी बुधवारी जरांगे यांच्यावर पलटवार केला आहे. त्या म्हणाल्या, ज्या पद्धतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आईवर टीका झाली ते महाराष्ट्राला पटणार नाही. आपण छत्रपती शिवाजी महाराजांचे मावळे आहोत. आम्हालाही तुमच्याविषयी आदर आहे. तुम्ही एका समाजासाठी आरक्षणाचे काम करत आहात. नक्की करा. हे आरक्षण कुणी देणार असतील तर ते देवेंद्र फडणवीसच देतील. त्यामुळे त्यांच्या आईवर ज्या पद्धतीने टीका करण्यात आली ती टीका महाराष्ट्रात कुणीही खपवून घेणार नाही.

आता त्यांनी आपले शब्द मागे घेतलेत. ही चांगली गोष्ट आहे. पण त्याची पुनरावृत्ती होणार नाही याची काळजी त्यांनी घ्यावी. राहिली गोष्ट माझी, तर मला जे खटकले त्यावर मी बोलले. त्यावर नेहमीप्रमाणे ते मलाही बरेचकाही बोलले. मी बाप्पांच्या आगमनाची वाट पाहत होते. त्यामुळे शांत होते. वेळ आल्यानंतर मी त्यालाही योग्य ते उत्तर देईन. मी रोज अनेकांच्या शिव्या ऐकते. आम्ही कुणाच्याही बापाला घाबरत नाही.

## गणेशोत्सवात नवा धमाका!

■ **मुंबई :** यंदाचा गणेशोत्सव केवळ भक्ती-भावनेपुरता मर्यादित राहणार नाही, तर सर्जनशीलतेलाही नवे व्यासपीठ मिळणार आहे. सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून महाराष्ट्र शासनाचा सांस्कृतिक कार्य विभाग आणि महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळाने पहिल्यांदाच रील स्पर्धेचे आयोजन केले आहे.

२७ ऑगस्टपासून ७ सप्टेंबरपर्यंत ऑनलाईन रील अपलोड करता येणार असून स्पर्धा विभागीय, राज्यस्तर आणि भारताबाहेरील खुला गट अशा तीन गटांमध्ये होईल. ३० ते ६० सेकंदाच्या रीलमध्ये पर्यावरण संवर्धन, स्वदेशी, गडकिल्ले, संस्कृती, ऑपरेशन सिंदूर या थिमला स्पर्धकांना न्याय द्यावा लागणार आहे.

बक्षिसे मात्र खऱ्या अर्थाने थरार निर्माण करणारी आहेत. विभागीय स्तरावर २५ हजार रुपयांपासून तर राज्यस्तर आणि आंतरराष्ट्रीय गटात थेट १ लाख रुपयांपर्यंत पारितोषिकं मिळणार आहेत. विजेत्यांना आकर्षक रोख रक्कमेसह मानाचा गौरवही मिळेल. नोंदणीसाठी खास गुगल फॉर्म तयार करण्यात आला असून filmcitymumbai.org तसेच दादासाहेब फाळके चित्रनगरीच्या सोशल मीडिया हँडल्सवर स्पर्धेची संपूर्ण माहिती उपलब्ध आहे.

# म. जोतीबा व सावित्रीबाई फुले यांच्या समग्र वाङ्मयाचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते ग्रंथप्रकाशन

### महाज्योतीचा पुढाकार



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २७ :** महाराष्ट्र शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत कार्यरत महात्मा जोतीबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर यांच्या मार्फत क्रांतिसूर्य महात्मा जोतीबा फुले आणि ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या समग्र वाङ्मयाचे भव्य प्रकाशन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मंत्रालयात झाले.

या कार्यक्रमाला इतर मागास बहुजन कल्याण मंत्री तथा महाज्योतीचे अध्यक्ष अतुल सावे, महाज्योतीचे व्यवस्थापकीय संचालक मिलिंद नारिंगे, महाज्योतीचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रशांत वावगे उपस्थित होते. संचालक मंडळाच्या बैठकीत फुले दाम्पत्यांच्या विचारांचा प्रचार-प्रसार व्यापक पातळीवर व्हावा, या उद्देशाने त्यांचे एकत्रित समग्र महावाङ्मय प्रकाशित करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला होता.

या समग्र वाङ्मयामध्ये एकूण १२४२ पृष्ठांचा अनमोल ठेवा असून महात्मा जोतीराव फुले यांचे २३ आणि सावित्रीबाई फुले यांचे १४ ग्रंथ, त्यांचे पत्रव्यवहार तसेच संबंधित कागदपत्रांचा समावेश करण्यात आला आहे.

शिक्षणाचा अधिकार, शेतकऱ्यांचे प्रश्न, अस्पृश्यता निर्मूलन, स्त्री-पुरुष समानता आणि धर्माचा खरा अर्थ या जीवनदृष्टीला दिशा देणाऱ्या विचारांचा यात संग्रह आहे.

या ग्रंथाची वैशिष्ट्यपूर्ण बाब म्हणजे पुण्यातील महात्मा फुले वाडा तसेच साताऱ्यातील नायगाव येथील सावित्रीबाईंच्या जन्मगावातील रंगीत छायाचित्रांचा समावेश यात करण्यात आला आहे. उच्च तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाच्या मान्यतेने हा ग्रंथ प्रकाशित झाला असून एकूण २७,००० प्रती छापण्यात आल्या आहेत.

**समग्र वाङ्मय नव्या पिढीसाठी दीपस्तंभ : मंत्री अतुल सावे**

फुले दांपत्यांचा वारसा हा केवळ इतिहास नसून आजच्या समाजातील असमानतेवर प्रहार करणारा जिवंत मार्गदर्शक आहे. त्यांच्या विचारांतून आपल्याला हे स्पष्ट शिकायला मिळते की, शिक्षण हेच खऱ्या अर्थाने मुक्तीचे शस्त्र आहे. स्त्रीशक्तीचे सबलीकरण हे समाजाच्या प्रगतीचे मूळ असून, अन्याय व अंधश्रद्धेविरुद्धचा संघर्ष थांबता कामा नये, हा त्यांचा ठाम संदेश आहे. आजच्या काळातही विषमता, अज्ञान, अंधश्रद्धा आणि जातीय भेदभाव या समाजाला पोखरत आहेत. अशा परिस्थितीत फुले दांपत्यांचे समग्र वाङ्मय म्हणजे नव्या पिढीसाठी दिशादर्शक दीपस्तंभ ठरणार आहे, असा विश्वास इतर मागास बहुजन कल्याण मंत्री तथा महाज्योतीचे अध्यक्ष अतुल सावे यांनी व्यक्त केला.

प्रत्येक जिल्ह्यात ७५० प्रतींचे वितरण करण्याची जबाबदारी सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग यांच्यावर सोपविण्यात आली आहे. या ग्रंथांचे वितरण जिल्हास्तरीय शिक्षण विभाग, आर्थिक विकास मंडळ तसेच आश्रमशाळा-वसतिगृहांमार्फत केले जाणार आहे.

याशिवाय राज्यातील सर्व केंद्रीय व राज्य मंत्री, खासदार, आमदार, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींपर्यंतही हा ग्रंथ पोहोचविला जाणार आहे. तसेच विविध शैक्षणिक स्पर्धांमध्ये विजयी ठरणाऱ्या विद्यार्थ्यांना हा ग्रंथ पारितोषिक स्वरूपात देण्यात येणार आहे, जेणेकरून त्यांना समाजपरिवर्तनासाठी नवी दिशा मिळेल.

शासन स्तरावर प्रथमच फुले दाम्पत्यांच्या साहित्यावर आधारित इतक्या व्यापक प्रमाणात वाङ्मय प्रकाशित झाले आहे. समाजातील बहुजन वर्गाला आत्मसन्मानाने जगण्याचा मार्ग दाखवणाऱ्या फुले दाम्पत्यांच्या विचारांचा प्रसार निश्चितच अधिक व्यापक होईल, अशी भावना मंत्री सावे यांनी व्यक्त केली.

### भाजपत येताच माजी आमदार थोपटेंच्या कारखान्याला

## ४०९ कोटींचे कर्ज मंजूर



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २७ :** महाराष्ट्र मंत्रिमंडळाच्या बैठकीत भाजप नेते आणि काँग्रेसचे माजी आमदार संग्राम थोपटे यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या राजगड सहकारी साखर कारखान्यासाठी ४०९ कोटी रुपयांच्या कर्जाला मंजुरी देण्यात आली.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या प्रस्तावाला विरोध केला. माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या काळापासून सरकारी मदत मिळूनही भोर तालुक्यातील हा कारखाना सातत्याने अडचणीत असून तो व्यवहार्य नसल्याचे अजित पवारांनी सांगितले. संग्राम थोपटे यांनी एप्रिल महिन्यात भाजपमध्ये प्रवेश केला. त्यामुळे त्यांना लाभ झाला आहे.

संग्राम थोपटे यांचे वडील अनंतराव थोपटे आणि शरद पवार यांच्यात पारंपरिक राजकीय वैर होते. पण, अजित पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पाडून त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत शरद पवारांची कन्या सुप्रिया सुळे यांच्या विरोधात बारामतीतून निवडणूक लढवल्यानंतर, शरद पवारांनी थोपटे कुटुंबाशी संबंध सुधारण्याचा प्रयत्न केला होता. लोकसभेला सुप्रिया सुळे विजयी झाल्या, तर त्यानंतर झालेल्या विधानसभेत थोपटे पराभूत झाले.

## हक्काच्या महार वतनांच्या जमिनी परत करा!

### बसपाचे प्रदेश महासचिव डॉ. हुलगेश चलवादी यांची मागणी



■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. २७:** गावसेवेचा मोबदला म्हणून देण्यात आलेली 'महार वतने' हा कुठलाही दानधर्म नव्हता. वतनांच्या जमिनी त्यामुळे मूळ वारसांना परत मिळाल्याशिवाय राज्यातील सामाजिक न्याय पूर्ण होणार नाही. 'वतन जमीन हक्क कायदा' करीत हक्काच्या महार वतनांच्या जमिनी परत द्या, अशी मागणी बहुजन समाज पक्षाचे प्रदेश महासचिव, प. महाराष्ट्र झोन मुख्य प्रभारी डॉ. हुलगेश चलवादी यांनी केली.

या मुद्द्यावर समितीची नेमणूक, अहवाल तयार करण्यात वेळ न घालवता स्पष्ट कायदा करून जमिनी परत देण्याची प्रक्रिया सुरू करावी. इतिहासातील अन्याय दुरुस्त करूनच खऱ्या अर्थाने सामाजिक न्यायाची पूर्तता होईल. कायद्याने व शासनाच्या ठोस निर्णयानेच महार वतनांच्या मुद्द्यावर कायमस्वरूपी तोडगा निघू शकतो, असे मत त्यांनी व्यक्त केले.

कायदा करून महार वतन म्हणून नोंदवल्या गेलेल्या जमिनी प्रत्यक्ष वारसदारांना परत देण्याची तरतूद करावी. अनेक ठिकाणच्या जमिनी सरकारच्या ताब्यात आहे. अनेक गावांमध्ये महार वतन जमिनींचे कागदपत्रांवर हक्क निश्चित नाहीत. काही ठिकाणी या जमिनी बळकावल्या गेल्या आहेत. न्यायालयीन लढाया सुरू असून महार समाज आपल्या ऐतिहासिक हक्कांसाठी आवाज उठवत आहे. अशा प्रकरणावर विशेष न्यायाधिकरण स्थापन करून जलद निर्णय देण्याची गरज असल्याचे देखील डॉ. चलवादी म्हणाले.

वतनाच्या जमिनींचे सर्वेक्षण व नकाशे तयार करणे, कोणती जमीन कुठल्या वतनदाराच्या नावावर होती, हे स्पष्ट करणे आवश्यक आहे. ज्यांच्या जमिनी दुसऱ्यांकडे गेल्या आहेत,त्यांना सरकारकडून पर्यायी जमीन किंवा नुकसानभरपाई देण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली. आतापर्यंतच्या सरकारांनी हा प्रश्न खितपत ठेवला. राजकीय इच्छाशक्तीच्या अभावी हा मुद्दा मार्गी लागला नाही.बहुजनांच्या हाती सत्ता येणे त्यामुळे आवश्यक आहे. दलितांवरील अत्याचारांविरुद्ध अत्याचार प्रतिबंधक कायदा झाला, तसाच वतन जमीन हक्क कायदा वेगळा कायदा करणे आवश्यक असल्याचे डॉ. चलवादी म्हणाले.

पेशवाई व ब्रिटिश राजवटीत गावातील कायदा-सुव्यवस्था, रक्षण, संदेश पोहोचवणे, मृतदेह उचलणे, सरकारी आदेश पाळवणे अशी महत्त्वाची कामे महार समाजाकडे सोपवली जात. या सेवेच्या मोबदल्यात त्यांना वतन स्वरूपात जमीन देण्यात आली होती. मात्र स्वातंत्र्यानंतर वतन प्रथा रद्द झाली आणि वतनाच्या जमिनी सरकारी खात्यात दाखल झाल्या किंवा इतरांनी बळकावल्या. परिणामी महार समाजाला त्यांच्या पूर्वजांच्या हक्काची जमीन परत मिळाली नाही, अशी खंत त्यांनी व्यक्त केली आहे.

## कोकणवासियांना बाप्पा पावला...

## बहुचर्चित रो रो सेवा १ सप्टेंबर पासून

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २७ :** गणेशोत्सव, होळी अशा विविध सणांनिमित्त कोकणवासीय कोकणात मुक्कामी जातात. त्यांचा प्रवास अधिक सुखकर व्हावा यासाठी राज्य शासनाने मुंबई ते (जयगड) रत्नागिरी आणि मुंबई ते (विजयदुर्ग) सिंधुदूर्ग रो-रो सेवा सुरू केली असल्याची माहिती मत्स्यव्यवसाय, बंदरे मंत्री नितेश राणे यांनी दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून मुंबई ते कोकण समुद्रामार्गे प्रवास करण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या रो-रो सेवेची माहिती देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी कोकणवासीयांना आणि पर्यटकांना या वाहतुक सेवेमुळे मोठा दिलासा मिळणार असल्याचे राणे यांनी सांगितले.

केंद्रीय शिपींग मंत्रालय आणि राज्याच्या बंदरे विभागाने या जलवाहतूक सेवेस अंतिम मंजूरी दिली आहे. या रो-रो सेवेसाठी अत्यावश्यक असणाऱ्या एकूण १४७ परवानग्या प्राप्त झाल्या असून, यामुळे कोकणवासीयांचा अतिशय सुरक्षित व जलद प्रवास होणार आहे. हवामानाच्या बदलामुळे मच्छिमारांनाही समुद्रात जाण्यासाठी सतर्कतेचा इशारा देण्यात आला असल्याने हवामान सुरळीत होताच प्रत्यक्ष प्रवाशांसाठी ही रो-रो सेवा १ सप्टेंबरपासून सुरू होणार आहे.

**अडीच हजारांपासून तिकिट सुरू**

भाऊचा धक्का ते जयगड तीन तास तर भाऊचा धक्का ते विजयदुर्ग पाच तास प्रवास करता येणार आहे. येथे जेट्टीची सुविधा असून, जेट्टीवरून शहरात जाण्यासाठी बसेसची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे.

२५ नॉट्स स्पीडची ही एम टू एम नावाची रो-रो बोट असणार आहे जी दक्षिण आशियातील वेगवान बोट आहे. यामध्ये



इकोनॉमी वर्गात ५५२ आसनांची व्यवस्था, प्रिमीयम इकोनॉमी मध्ये ४४, बिझनेस मध्ये ४८, तर फर्स्ट क्लासमध्ये १२ प्रवाशांची क्षमता असणार आहे. तर, ५० चार चाकी, ३० दुचाकी क्षमता असलेली ही रो-रो आहे. कोकणवासीयांना इकोनॉमी क्लाससाठी २५०० रुपये दर आकारला जाणार आहे. प्रिमियम इकोनॉमीसाठी प्रवाशांसाठी ४ हजार, बिझनेस क्लाससाठी ७५००, फर्स्ट क्लाससाठी ९ हजार रुपये दर आकारला जाणार आहे.

चार चाकीसाठी ६ हजार, दु-चाकीसाठी १ हजार, सायकलसाठी ६००, मिनी बससाठी १३ हजार आणि बसच्या आसनक्षमतेप्रमाणे दर वाढत जाणार आहेत. भविष्यात श्रीवर्धन, मांडवा असे विविध थांबे असणार आहेत तर त्यासाठी जेट्टीही तयार करण्यात येणार असल्याची माहिती नितेश राणे यांनी दिली.

## अजरामर पार्श्वगायक मुकेश



परवा २७ ऑगस्ट, हिंदी चित्रपट सृष्टीतील अजरामर पार्श्वगायक मुकेश यांचा स्मृतिदिन होता. २२ जुलै १९२३ रोजी मुकेश यांचा जन्म झाला. मुकेश यांचे संपूर्ण नाव मुकेश चंद माथूर असे होते. दिल्लीतील दारियागंज आणि चांदणी चौकात त्यांचे बालपण गेले.

त्यांच्या वडिलांचे नाव जोरावर चंद माथूर असे होते ते इंजिनिअर होते तर आई राणी या गृहिणी होत्या. मुकेश यांना बालपणापासून संगीताची आवड होती. त्याकाळातील प्रख्यात गायक कुंदनलाल सहगल यांचे ते प्रशंसक होते. त्यांनाही कुंदनलाल सहगल यांच्याप्रमाणे अभिनेता व गायक व्हायचे होते त्यासाठी त्यांनी लहान वयातच त्यांची संगीताचे प्राथमिक धडे गिरवले.

त्याकाळातील गाजलेले अभिनेते मोतीलाल यांनी मुकेश यांना त्यांच्या दूरच्या बहिणीच्या लग्नात गाताना पाहिले. मुकेश यांचा आवाज ऐकता क्षणीच ते त्यांच्या आवाजाच्या प्रेमात पडले. एक दिवस हा आवाज हिंदी चित्रपट सृष्टिचा आवाज बनेल असे ते त्यांच्या आई वडिलांना म्हणाले.

त्यांनी मुकेश यांना मुंबईत आणले आणि गायक पंडित जगन्नाथ यांच्याकडून गायनाचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण घेण्यास सांगितले. त्यांनीही गायनाचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण घेतले. या दरम्यान त्यांना काही चित्रपटात अभिनयाच्या ऑफर्स आल्या. मुकेश यांचा राजबिंडा चेहरा आणि स्मितहास्य यामुळे त्यांना थेट नायकाच्या भूमिका मिळाल्या.

१९४१ साली निर्दोष या चित्रपटात त्यांनी पहिल्यांदा अभिनय केला. त्यानंतर चार पाच चित्रपटात त्यांनी भूमिका केल्या मात्र त्यांनी अभिनय केलेले चित्रपट काही विशेष चालले नाही त्यामुळे नायक बनण्याचे आपले स्वप्न बाजूला ठेवून त्यांनी गायनावर लक्ष केंद्रित केले.

गायक म्हणून मुकेश यांना पहिला ब्रेक मिळाला तो १९४५ साली आलेल्या पहिली नजर या चित्रपटात. या चित्रपटात त्यांनी गायलेले दिल जलता है तो जलने दो हे गीत खूप लोकप्रिय झाले. या गीतामुळे चित्रपट सृष्टित त्यांची ओळख निर्माण झाली. या गाण्यावर कुंदनलाल सहगल यांच्या शैलीचा प्रभाव होता. १९५८ साली आलेल्या यहुदी या चित्रपटातील ये मेरा दिवानापन है हे गाणे देखील खूप गाजले या गाण्याद्वारे त्यांनी स्वतःची वेगळी शैली निर्माण केली आणि कुंदनलाल सहगल यांच्या प्रभावातून ते बाहेर पडले.

त्यानंतर हिंदी चित्रपट सृष्टित मुकेश युग सुरू झाले. त्यांनी अनुनासिक शैलीत गायलेले गाणे हिट होऊ लागले. मेला आणि अंदाज या चित्रपटात त्यांनी गायलेले सर्व गाणी लोकप्रिय झाले.

अंदाज हिट झाल्यानंतर मुकेश रणजित नावाच्या स्टुडिओत गायनाचा रियाज करीत होते तेंव्हा तिथे एक देखणा तरुण आला आणि म्हणाला किती भावनाप्रधान आहे तुझा आवाज. मला तुझा आवाज खूप आवडतो. तो तरुण होता राज कपूर. पुढे राज कपूर आणि मुकेश हे हिंदी चित्रपट सृष्टीतील यशाचे समीकरण बनले.

या जोडीने अनेक हिट गाणी दिले. आग, आवरा, श्री ४२०, बरसात, परवरिश, अनाडी, संगम, मेरा नाम जोकर या आर के बॅनरच्या चित्रपटातील मुकेश यांनी गायलेली सर्व गाणी गाजली. राज कपूर यांचा आवाज अशीच मुकेश यांची ओळख निर्माण झाली. राज कपूर यांच्या सत्यम शिवम सुंदरम या चित्रपटातल्या गाण्याचे रेकॉर्डिंग करून ते अमेरिकेला गेले होते.

डेट्रॉय मिशिगन मध्ये २७ ऑगस्ट १९७६ रोजी ते लवकर उठून अंघोळीसाठी गेले असता अचानक त्यांच्या छातीत कळ आली आणि त्यांची प्राणज्योत मावळली. त्यांच्या निधनानंत राज कपूर यांनी आज माझा आवाज कायमचा हरपला! अशी प्रतिक्रिया दिली. मुकेश यांनी तीन दशकांहून अधिक काळ अनोख्या गायन शैलीने रसिकांवर मोहिनी घातली.

मुकेश यांचा दर्दभरा आवाज रसिकांच्या मनावर कायमचा कोरला गेला आज इतक्या वर्षानीही त्यांचा दर्दभरा आवाज रसिकांना मोहित करतो.

त्यांना अनेक पुरस्कार मिळाले. रजनिगंधा या चित्रपटासाठी त्यांना राष्ट्रीय पुरस्कार मिळाला तर चार वेळा फिल्मफेअर पुरस्कार मिळाला मात्र ते रसिकांच्या मनात त्यांचे जे स्थान आहे त्याला सर्व पुरस्काराहून श्रेष्ठ आहे मानत. त्यांच्यासारखा महान पार्श्वगायक पुन्हा होणार नाही. स्मृतिदिनी मुकेश यांना भावपूर्ण आदरांजली!



**श्याम ठाणेदार**
**दौंड. जिल्हा पुणे.**
**९९२२५४६२९५**

## जतचा काँग्रेस उमेदवार मतचोरी करून हरवण्यात आला..

### काँग्रेस समर्थक खासदार विशाल पाटील यांचा दावा



■ **वृत्तसंस्था, सांगली, दि. २७:** सांगली जिल्ह्यात जत विधानसभा मतदारसंघातील काँग्रेसचा उमेदवार हरला नाही, तर त्याला मतचोरीच्या माध्यमातून हरवण्यात आले, असा दावा काँग्रेस समर्थक खासदार विशाल पाटील यांनी केला आहे.

ज्या गावात ५०० मतदार आहेत, त्या गावात १५०० मतदान झाले. आपण गाफिल राहिलो. त्यामुळे कुठूनही माणसे आली आणि मतदान करून गेली, असे ते म्हणालेत. त्यांच्या या दाव्यामुळे जिल्ह्यात एकच खळबळ माजली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे माजी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी नुकतीच मतचोरीच्या मुद्द्यावरून भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांच्यावर हल्ला चढवला होता. त्यानंतर विशाल पाटील यांनी त्यांच्या सुरात सूर मिसळत वरील आरोप केला. ते म्हणाले, जत विधानसभा मतदार संघातील काँग्रेसचा उमेदवार हरला नाही. त्याला मतचोरीच्या मदतीने हरवण्यात आले. हा प्रकार ठरवून करण्यात आला.

जो माणूस ५ पिढ्यांपासून जत मतदार संघातील रहिवाशी आहे, त्याची जात, धर्म पाहून त्याचे नाव मतदार यादीतून वगळण्यात आले. त्यानंतर जो व्यक्ती मतदारसंघातील रहिवासी नाही त्याचे नाव मतदार यादीत टाकण्यात आले. असे अनेक प्रकार समोर आलेत.

ते पुढे म्हणाले, ज्या गावात केवळ ५०० मतदार आहेत, त्या गावात तब्बल १५०० मतदान झाले. आपण गाफिल राहिलो. त्यामुळे कुठूनही माणसे आली आणि मतदान करून गेली. आजची राजकीय परिस्थिती पाहिली तर लोकशाहीची मूल्ये धोक्यात सापडल्याची स्पष्ट जाणिव होते.

एकीकडे विकासाच्या नावाखाली जनतेची दिशाभूल सुरू आहे, तर दुसरीकडे दडपशाही व कटकारस्थानांचा खेळ सुरू आहे. खासदार राहुल गांधी यांनी मतचोरीचा मुद्दा समोर आणून या सरकारला उघडे पाडले आहे.

संविधानाने आपल्याला दिलेला मतदानाचा अधिकारही या हुकूमशाही सरकारने आपल्यापासून हिरावून घेतला. हे सरकार मतांची चोरी करून खुलेआमपणे सत्ते आले आहे. त्यामुळे प्रत्येक कार्यकर्त्यानें या प्रकरणी सजग राहून वस्तुस्थिती जनतेपर्यंत पोहोचवण्याची गरज आहे.

काँग्रेस आमदार विश्वजित कदम यांनीही यावेळी काँग्रेसचा विचार तळागाळापर्यंत पोहोचवण्याचे आवाहन केले. सध्या काँग्रेस पक्षासाठी आव्हानकारक काळ आहे. पण अशा काळातच संघटनेची खरी ताकद स्पष्ट होते.

काँग्रेसच्या विचारधारेचा पाया लोकशाही, समानता व न्यायावर आधारित आहे. काँग्रेसचा विचार हा शाश्वत व विश्वासार्हता जपणारा असून, तो युवापिढीला भावणारा आहे. फक्त आता हा विचार तळागाळापर्यंत पोहोचवण्याची गरज आहे. संघटनेतून नवे नेतृत्व तयार करण्याची, संघटना बळकट करण्याची हीच योग्य वेळ आहे, असे ते म्हणाले.

महासागर ●गुरुवार,दि.२८ ऑगस्ट २०२५

# अकोला

पान ३





## गणपती बाप्पा मोरया मंगलमूर्ती मोरयाच्या गजराने सर्वत्र आनंदमय वातावरण

# सार्वजनिक गणपतींसह घराघरात झाली श्री गणेशाची प्रतिष्ठापना





**▪अकोला,दि २७ (प्रतिनिधी) :**

गणपती बाप्पा मोरया मंगलमूर्ती मोरया च्या गजराने संपूर्ण वातावरण आनंदमय झाले असून सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या मोठ्या मोठ्या पडालांमध्ये मोठ्या गणपतीसह घराघरात श्री गणेशाची प्रतिष्ठापना करण्यात आली आबाल वृद्धांसह लहान मोठ्यांनी वाजत गाजत भक्तीमय वातावरणात श्री गणेशाला आपापल्या घरी नेले .

त्यामुळे संपूर्ण रस्ते भक्तिमय वातावरणात नाऊन निघाले होते तर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या मोठ्या मोठ्या मुर्त्या सुद्धा ढोल ताशाच्या गजरात भजनी मंडळांच्या जयघोषाने मध्ये विराजमान झाले आज सकाळपासूनच संपूर्ण वातावरणामध्ये गणपती बाप्पा मोरया चा गजर दणाणत होता सर्वत्र गणेशाची मूर्ती घेण्याची लगबग दिसून आली अनेक लहान मोठ्यांनी छोट्या मोठ्या दुकानांमधून मूर्तिकारां जोडून श्री गणेशाच्या आकर्षक व सुंदर सुंदर मुर्त्या घेतल्याचे चित्र सर्वत्र दिसत होते.

वर्षभर ज्या गणेशोत्सवाची आभार वृद्धांसह सर्वांनाच ओढ लागलेली असते तो श्री गणेशोत्सव आज पासून सुरू झाला आता दहा दिवस सकाळ संध्याकाळ गणेशाच्या आरतीने वातावरण भक्तीमय होणार आहे. अनेक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे वेगवेगळे उपक्रम राबवून भाविकांचे मनोरंजन करतात तर सामाजिक उपक्रम राबवून समाजसेवा सुद्धा करतात सामाजिक उपक्रमावर जास्तीत जास्त भर द्यावा याकरिता यावर्षीपासून महाराष्ट्र शासनाने गणेशोत्सव मंडळांना बक्षिसे जाहीर केले असून शासकीय उत्सव म्हणून सुद्धा जाहीर करण्यात आला आहे. त्यामुळे यापुढे सुंदर देखावे सामाजिक उपक्रम आकर्षक मूर्ती पर्यावरण पूरक वातावरण अशा गणेश मंडळांना शासनातर्फे बक्षीस देण्यात येणार आहेत तसेच मिरवणुकीत सहभागी होणारे भजनी मंडळ गणपती समोर करणारे भजन या भजन मंडळांना सुद्धा शासनातर्फे ३०००० रुपये अनुदान शासन देणार आहे.



## थोडक्यात

### नगरपरिषद निवडणुकांचे वारे वाहू लागले

**तेल्हारा :** निवडणुकांची तयारी राज्य निवडणूक आयोगाने सुरू केली असून, तेल्हारा नगरपरिषद निवडणुकीसंदर्भातही हालचाली वेगाने सुरू झाल्या आहेत. वॉर्डरचना, आरक्षणाची आखणी व मतदार यादीची प्रक्रिया यामुळे शहरातील राजकीय वातावरण तापू लागले आहे. राज्यातील नगरपरिषद निवडणुका ऑक्टोबर २०२५ पर्यंत होण्याची शक्यता वर्तवली जात असून, ईव्हीएमच्या मर्यादेमुळे या निवडणुका काही ठिकाणी टप्प्याटप्प्याने होण्याचीही शक्यता आहे. तेल्हारा शहरातील अनेक सामाजिक व राजकीय संघटना यासाठी सज्ज होत आहेत. निवडणूक आयोगाने वॉर्ड रचना व आरक्षणाचे प्राथमिक आराखडे जाहीर करण्याचे काम सुरू केले असून, येत्या काही दिवसांत त्यावर हरकती व सूचनांसाठी नागरिकांना संधी दिली जाणार आहे. त्यामुळे शहरात कोणत्या समाजघटकाला किती प्रतिनिधित्व मिळणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. स्थानिक नेते मंडळी कार्यकर्त्यांची बैठक घेत असून, प्रचारासाठी आताच रणनीती आखण्यास सुरुवात झाली आहे. नागरिक मात्र पाणीपुरवठा, रस्त्यांची दुरवस्था, स्वच्छता व मूलभूत सुविधा या मुद्द्यांवर उमेदवारांची कसोटी घेणार असल्याचे संकेत मिळत आहेत. निवडणुकांच्या तारखांची अधिकृत घोषणा होणे बाकी असले तरी, तेल्हारा नगरपरिषद क्षेत्रात राजकीय वातावरणात उत्सुकता आणि चैतन्याची लहर निर्माण झाली आहे.

### ग्रंथवाचन व महापुजन सप्ताहाचे आयोजन

**अकोट :** तालुक्यातील पुंडा येथे मानपुरी महाराज गुरू काशीपुरी महाराज यांचा ११ व्या पुण्यातिथीनिमित्त आज पासून २ सप्टेंबर पर्यंत ग्रंथवाचन व पूजाचे आयोजन दत्तात्रय संस्थान पुंडा च्या वतीने करण्यात आले आहे.२७ ऑगस्ट ते २ सप्टेंबर या दरम्यान दररोज सकाळी ६ ते ७ काकडा ९ ते १२ व दुपारी ३ ते ५ निजाल नीज आत्मा बोधवाचणं सायंकाळी ६ ते ७ आरती व अन्नदान व रात्री ७ ते १० सोळस पूजेचा कार्यक्रम आयोजिला आहे करिता अनुक्रमे अन्नदाते श्री पेठे (पुणे), अशोकराव साबळे (तारोळा),श्रीमती मंगलाबाई सुरेश गावंडे (पुणे), दत्ता गळसकर (पाथर्डी), प्राध्यापक श्रीकांत सपकाळ (पुंडा), दिगंबर सरप ( नागझरी) या अन्नदात्यांकडून अन्नदानाचे व सोळस पूजेचे आयोजन केले आहे. २७ ऑगस्ट रोजी सकाळी ६ वाजता कळस स्थापना करून ताराचंद महाराज तरनोळीकर (द्यारवा) यांचा वाणीतून निज आत्मा बोध व ग्रंथ वाचन केले जाईल. सप्ताहाचा समाप्तीला सकाळी ९ ते १२ यांचा पालखीचे गाव प्रदक्षिणा व दुपारी १२ वाजता पासून महाप्रसादाचे आयोजन व रात्री १० वाजता पासून बत्तिशी महापूजा प. पू.वासुदेव भारती गुरू बळीराम भारती महाराज, दत्तशिखर माहूर यांचा उपस्थितीत होणार आहे .

## तेल्हारा शहरात पशुपतिनाथ मंदिर व घरोघर हरितालिका महोत्सव साजरा



**▪तेल्हारा,दि २७ (प्रतिनिधी) :**

तेल्हारा शहरातील लोकमान्य चौक स्थितपशुपतिनाथ मंदिरात तसेच घरोघर भाद्रपदशुद्ध३,मंगळवार दि.२६ऑगष्ट२०२५ रोजी सकाळी ५.५६ ते ८.३१याअडीचतासांच्या शुभमुहूर्तावर विवाहित महिलांनी आपल्या पतीला दीर्घायुरारोग्य लाभावे आणि अविवाहित कुमारिकांनी इच्छित जीवनसाथी (पती) मिळावा यासाठी 'हरितालिका'व्रत करून भगवान शिव आणि माता पार्वती यांचे विधिवत मनोभावे पूजन केले. हिंदू धर्मातील महिला आणि कुमारिकांसाठीच्या या धार्मिक व्रताच्या तयारीसाठी घरोघर आदल्यादिवसापासूनच जय्यत तयारी, लगबग स्त्री शक्तीमध्ये दिसून आली. पशुपतिनाथ देवस्थानात तसेच घरोघर पूजास्थानी सजावट, केळ्यांच्या खांबांसहसुशोभीकरण, आंब्याच्यापानांचेतोरण, विशेषतः सोळा प्रकारच्या वनस्पती, शिवलिंग स्थापनार्थ वाळू, तर बाजारातून मूर्ती आणून त्यांची विधिवतस्थापना करण्यातआली.

मंगळवारी हरितालिका दिनी विघ्नहर्ता श्री गणरायांचे पूजन, जीवनोपयोगी वस्तू प्रधान करणाऱ्या भुमातेचे पूजन,तेजोमय प्रकाशदेणाऱ्या वआपले जीवनउजळून टाकणाऱ्या दीपकाचे पूजनहीयावेळीकरण्यात आले. याप्रसंगी विविधबेलपत्रीवाहण्यात आल्या, मुख्यतः आघाडा, केना, दूर्वा, केवडा, धोतरा अशा तऱ्हेच्या विविध औषधोपयोगी वनस्पती सोळा -सोळा या प्रमाणात वाहण्यात आल्या, व त्यांच्याप्रती कृतज्ञतेची भावना व्यक्त करण्यात आली.

नैवेद्य आरती कथा वाचनही करण्यात आले. काही ठिकाणी प्रदोष काळी (सायंकाळी) हरितालिका व्रत पूजन करण्यात आल हरितालिका या व्रता मागे एक आख्यायिका आहे पूर्वी पर्वतराजाची मुलगी पार्वती ही उपवर झाली होती, तिला योग्य वर मिळावा यासाठी नारद मुनी पर्वतराजाकडे श्रीविष्णूंसाठी तिचा हात मागायला येतात हे पाहून पर्वतराज खूप आनंदित होतात नारदमुनी तिथून निघून गेल्यावर पर्वतराजा ही गोष्ट आपल्या लेकीला पार्वतीला सांगतात. परंतु ते तिला रुचत नाही. त्यामुळे ती आपल्या सखीकरवी वडिलांना निरोप पाठवते की, मला शंकरावाचून दुसरा पती करणे नाही. आणि सखीसह वनात निघून जाते .

### नदीकाठावरील गावांना सतर्कचा इशारा

**पोपटखेड :** प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रामध्ये पाऊस सुरू असून धरणाच्या सुरक्षेच्या दृष्टीने आज दिनांक २७.०८.२०२५ दुपारी २.०० वाजता पोपटखेड प्रकल्पाचे २ द्वारे ५ सें.मी.उंचीने उघडून एकूण २२२.४५४ लीशल इतका पाण्याचा विसर्ग नदीपात्रात सोडण्यास सुरुवात करण्यात आली आहे.

पाणलोट क्षेत्रातून येणाऱ्या पाण्याच्या येव्या नुसार सोडण्यात येणाऱ्या विसर्गामध्ये कमी जास्त प्रमाणात आवश्यक बदल करण्यात येईल. तरी नदी काठच्या गावांतील नागरिकांनी सावध राहावे तसेच नदी पात्र ओलांडू नये.

## कुटासा येथे हरतालिका व्रत उत्साहात

### महिलांचा शिवभक्तीत भावपूर्ण सहभाग

**▪कुटासा,दि २७ (प्रतिनिधी) :**

पारंपरिक श्रद्धा व भक्तिभावाने ओतप्रोत भरलेले हरतालिका व्रत कुटासा येथे महिलांनी मोठ्या उत्साहात साजरे केले. या पवित्र दिनी गावातील विविध ठिकाणी महिलांनी सजावट करून शिवलिंगाची स्थापना केली. विशेष म्हणजे, या व्रतासाठी विविध वनस्पतींचे मिश्रण करून आकर्षक सजावट करण्यात आली.महिलांनी पवित्र नद्यान मधून आणलेल्या रेतीने शिवलिंगाची निर्मिती केली. त्यावर बेलपत्र, धोत्र्याचे फळ, गुलाबाची फुले, दुर्वा तसेच विविध फळे-फुले अर्पण करून भगवान शिवाची भक्तिभावाने पूजा केली. दिवसभर उपवास करून संध्याकाळी महादेवाच्या जयघोषाने वातावरण दुमदुमून गेले.या व्रतामध्ये लहान-मोठ्या महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. उपवास करून रात्री जागरण केले



गेले. जागरणादरम्यान भजन, कीर्तन व 'हर हर महादेव'च्या गजराने परिसर भक्तिमय झाला. हरतालिका व्रत कथा वाचन करून महिलांनी पारंपरिक रितीरिवाजांनुसार पूजा केली.

## गणेश उत्सव संबंधाने बाळापूर उपविभागातील आढावा बैठक संपन्न

**▪अकोला,दि २७ (प्रतिनिधी) :**

२६/०८/२०२५ रोजी राम मंदिर बाळापूर येथे बाळापूर उपविभागातील पोलीस स्टेशन परिसरातील गणेश मंडळाचे पदाधिकारी यांची आढावा बैठक मा. पोलीस अधीक्षक अर्चित चांडक साहेब यांचे अध्यक्षतेखाली १६.३० ते १७.३० वाजता दरम्यान घेण्यात आली. सदर वेळी गणपती मंडळाच्या समस्या ऐकून घेण्यात आल्या. मा.पोलिस अधिक्षक अर्चित चांडक साहेब यांनी तातडीने उपाययोजना करण्यात येणार असल्या बाबतचे आश्वासन उपस्थित असलेल्या गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांना दिले. तसेच श्री गणेशोत्सव दरम्यान डी जे साऊंड कोणीही वापरणार नाही तसेच लेजर लाईट चा वापर केल्यास सदर मंडळावार कार्यवाही करण्यात येणार असल्याच्या सूचना पोलिस अधीक्षक साहेबांनी दिल्या. तसेच पारंपारिक वाद्य वाजवून गणेशोत्सव साजरा करावा, तसेच



महाराष्ट्र शासनाने सदर गणेशोत्सव राज्य महोत्सव म्हणून साजरा करण्याचे ठरविले असल्या बाबत माहिती देण्यात आली.

सदर बैठकीला मा. बाळापूर उपविभागीय पोलीस अधिकारी गजानन पडघन, तहसीलदार वैभव फरतारे, नगर परिषद बांधकाम विभागाचे अभियंता गेडाम, विद्युत विभागाचे सहा.अभियंता अमोल मेहरे, आणि बाळापूर उपविभागातील सर्व पोलीस स्टेशन चे प्रभारी अधिकारी आणि बाळापूर उपविभागातील गणेश मंडळाचे १७५ ते २०० पदाधिकारी हजर होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एपीआय पंकज कांबळे यांनी, प्रास्ताविक उपविभागीय पोलीस अधिकारी गजानन पडघन यांनी तर आभार प्रदर्शन पोलिस निरीक्षक अनिल जुमळे यांनी केले.

## ऑपरेशन प्रहार अंतर्गत २ तलवारी व ३ फरसा नावाचे धारदार शस्त्र केले जप्त

**▪अकोला,दि २७ (प्रतिनिधी) :**

अर्चित चांडक, पोलीस अधीक्षक, अकोला यांचे निर्देशाप्रमाणे अकोला जिल्हयामध्ये अवैध धंदे समूळ नष्ट करण्यासाठी ऑपरेशन प्रहार मोहीम राबविण्यात येत आहे.

दिनांक २६/०८/२०२५ रोजी वेळ १७ / ४५ या मरतर्फे फिर्यादी एएसआय दिपक तायडे हे पो स्टे ला हजर असतांना गुप्तबातमीदार यांचे कडुन माहिती मिळाली की इसम नामे अजीज खान उर्फ राजा युनुस खान रा. शाहबाबु शाळेजवळ, भगतवाडी सैलानी नगर, डाबकी रोड अकोला याने त्याचे राहते घरामध्ये अवैधरित्या व विनापरवाना लोखंडी तलवारी तसेच फरसा धारदार शस्त्र विकी करीता ठेवलेले आहेत. अशा खात्रीलायक बातमीवरुन वरीष्ठांचे मार्गदर्शनाखाली प्राप्त माहितीप्रमाणे पो



स्टॉफ व दोन पंचासह जावुन अजीज खान उर्फ राजा याची त्याचे घराची पंचासमक्ष झडती घेतली असता त्याचे घरामध्ये एका रुममध्ये सोफयाचे मागे खाली एका पोतडयामध्ये काहितरी संशयास्पद स्त्िया गुंडाळलेले मिळून आले वरुन घरी हजर इसम अजीज खान उर्फ राजा यास ते काढून पोतडे खोलुन त्याची पाहणी केली असता त्यामध्ये २ धारदार लोखंडी तलवारी व ३ फरसा नावाचे धारदार लोखंडी शस्त्र असे एकूण ५ शस्त्र कि. अं. ६१००/रु चे मिळून आल्याने ते आरोपी याचे कडुन पंचासमक्ष जप्त करण्यात आले. आरोपी इसम याचे सदरचे कृत्य कलम ४,२५ आर्म ॲक्ट प्रमाणे होत असल्याने पो स्टे आरोपी विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यात येत आहे.

सदरची कारवाई मा. पोलीस अधिक्षक श्री. अर्चित चांडक साहेब, अप्पर पोलीस अधिक्षक श्री बी. चंद्रकांत रेड्डी साहेब, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. सतिश कुलकर्णी साहेब, ठाणेदार अभिषेक अंधारे पो.स्टे. डाबकी रोड यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि अनिल चव्हाण सोबत पो. स्टॉफ एएसआय दिपक तायडे, एएसआय सुनिल टोपकर, एएसआय फईम शेख, पोहेकॉ संतोष उपाध्याय, पोहेकों प्रविण इंगळे, पोहेकों नापोकॉ राजेश ठाकूर, पोकों मंगेश गिते मपोशि आश्विनी माने सर्व पो.स्टे. डाबकी रोड अकोला यांनी केली.

## पातूर तालुका कॉँग्रेस कमिटी ग्रामीणला अकोला जिल्हा कॉँग्रेस कमिटी ग्रामीणची मान्यता



**पातुर :** तालुका कॉँग्रेस कमिटी अध्यक्ष श्री राजेश गावंडे यांनी मान्यते करता पाठवलेली नवनियुक्त पातुर तालुका कॉँग्रेस कमिटी कार्यकारणीच्या प्रस्तावास अकोला जिल्हा कॉँग्रेस कमिटी अध्यक्ष श्री अशोकराव अमानकर यांनी मान्यता दिली आहे. महाराष्ट्र प्रदेश कॉँग्रेस कमिटी अध्यक्ष माननीय श्री हर्षवर्धन दादा सपकाळ साहेब यांनी निर्देशित केल्याप्रमाणे पक्ष संघटन मजबूत करण्याकरता सर्व नवनियुक्त तालुका पदाधिकारी ताकदीने कामाला लागतील असा विश्वास जिल्हाध्यक्ष श्री अशोकराव अमानकर यांनी व्यक्त केला तथा सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले व भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# श्री गजानन स्वामींची हीच खरी सेवा..!

आज भाद्रपद शुक्ल पंचमी (ऋषिपंचमी) अर्थात शास्त्राप्रमाणे सप्तऋषींच्या पूजनाचा दिन. तद्वतचं ऋषितुल्य समर्थ सद्गुरू श्री गजानन महाराजांच्या पुण्यतिथीचा दुहेरी योग. दुसरे वैशिष्ट्य म्हणजे श्री गजानन माऊलींच्या कृपा आशीर्वादाने ११५ वर्षानंतर तोच दिवस त्याच तिथी नुसार ऋषीपंचमी महोत्सव दिनांक २८ ऑगस्ट २०२५ ला भाद्रपद शुक्लपंचमी वार गुरुवार हा अद्भुत योग घडून आला आहे. आजपासून ११५ वर्षे आधी दिनांक २८ ऑगस्ट १९१० गुरुवारला शेगावी संत गजानन स्वामी समाधीस्थ झाले होते.

------------

ज्या ज्या वेळी धर्माला ग्लानी मरगळ येते आणि अनितीचा मार्ग अवलंबिला जातो. नाना प्रकारच्या यातने लोक गाजलेले असतात, तेव्हा साक्षात ईश्वर कुठल्याही योनी वाचून भूतलावर प्रकट झाले आहेत. जसे की गोरक्षनाथ जन्मले उकिरड्यात, कानिफनाथ जन्मले गजकर्णात त्याचप्रमाणे संत गजानन स्वामी शेगावात; उष्ट्यापत्रावळी वरील शीते वेचतांना प्रकट झाले.

संत अवताराचे मुख्य प्रयोजन म्हणजे भूतलावरील लोकांना सात्विक भावाने मार्गदर्शन करणे होय. संत आपले ज्ञान,अनुभव लोकांशी वाटून घेतात. त्यामुळे लोकांना जीवनाचा खरा अर्थ समजायला लागतो,हे कळल्यानंतर ते सदमार्गाचे धनी बनतात. नैतिक आणि आध्यात्मिक मार्गावर ज्यावेळेस समाज पदक्रमण करतो; तेव्हा सामाजिक सुधारणा होते. नेमके हेच कार्य संत करीत आले आहेत व त्यांच्या पश्चात असेच पुढे चालत राहावे करिता संतांनी आपली बोध वचने समाजाला दिली आहेत. त्यांनी घालून दिलेल्या शिकवणीच्या मार्गावर चालणे हीच खरी संत सेवा ठरते.



श्री दासगणू महाराजांनी गजानन स्वामींनी दिलेल्या बोधवचनांचे सखोल चिंतन विश्लेषण पूर्वक श्री गजानन विजय ग्रंथात केले आहे. एकविस अध्यायाचा विजयग्रंथ हा केवळ संतचरित्र नव्हे, तर प्रत्येक अध्यायाव्दारे चिंतन, मननातून मानवी मनास बोध होतो. ग्रंथाच्या पहिल्या अध्यायात महाराज उष्टा पत्रवाळीतील शीते वेचून खात आहे, हे महाराजांची आद्यकृती आहे. त्यातून अन्नाची नासाडी करू नये! हा बोध होतो.

दुसऱ्या अध्यायातून कीर्तनकार गोविंदबुवा टाकळीकर यांना उपदेश करतात की, बोलण्यात आणि वागण्यात ताळमेळ असावा. तिसऱ्या अध्यायातून माळी विठोबा घाटोळांची दांभिकता पाहून त्यास मार देतात आणि सांगतात की, प्रत्येकाला आपापल्या कर्माप्रमाणे फळ मिळते.



**शशिकांत मधुकर तोटे**
**दारव्हा, जि. यवतमाळ**
**९१३०८३५४५८**

चौथ्या अध्यायात महाराज म्हणतात की, प्रपंच करताना परमार्थ सुद्धा करावा.

*परमार्थ महाधन' जोडी देवाचे चरण..*

असे संत वचन आहे.

पाचव्या अध्यायात गजानन स्वामींनी योग बळाच्या आधारे भास्कर पाटलांच्या बारा वर्षांपासून कोरड्या पडलेल्या विहिरीला जल उत्पन्न करतात. सहाव्या अध्यायात मधमाशा भक्तांवर जेव्हा हल्ला चढतात तेव्हा सांगतात की, संकटें आल्यावर ईश्वराची भक्ती तुम्हाला तारुन नेईल.

सातव्या अध्यायात खंडू पाटील आजारी असताना उपदेश करतात की, पैसा हे सर्वस्व नाही. परमेश्वराची कृपा आणि आशीर्वाद ही तेवढेचं महत्वाचे आहें. आशीर्वादामुळे सगळे प्राप्त होते. आठव्या अध्यायात खंडू पाटलांना सांगतात की, कर्त्या पुरुषांना संसारात ब?याच अडचणींचा सामना करावा लागतो. तेव्हा डगमगून कधी जाऊ नये! तर ब्रह्मगिरी गोसावी यांचे गर्वहरण सुद्धा करतात.

नवव्या अध्यायात

*'गण गण गणात बोते....*

या सिद्ध मंत्राचा अर्थ विस्ताराने सांगितला आहे. जीव आणि ब्रह्म एकच आहे, हा महत्त्वाचा उपदेश सांगितला. दहाव्या अध्यायात गजानन स्वामींनी सुखलालाची द्वाड गाय शांत केली व सांगितले की प्राणीमात्रां विषयी भूतदया पाळावी. इतरांप्रति ईर्षा कधी करू नये. पुढे अकराव्या अध्यायात संचित, क्रियामान आणि प्रारब्ध या कमार्नेच फळ भोगावे लागते. याचे वर्णन सुद्धा केलेले आहे.

बाराव्या अध्यायात बच्चुलाल आगरवाल यास धनाचा देखावा करू नये. हा उपदेश दिला. तेराव्या अध्यायात गंगाभारती व पुंडलिक या दोन भक्तांवर आपल्या लीलेद्वारे व्याधीतून मुक्ती दिली. परमेश्वरावर अपार श्रद्धा असलेली व्यक्ती कुठल्याही जर्जर व्याधीतून मुक्त होते, हा बोध पुरेसा आहे.

चौदाव्या अध्यायात साक्षात नर्मदामाता बुडत्या नावेतील भक्तांचे रक्षण करते. पंधराव्या अध्यायात अकोल्यातील शिवजयंतीच्या उत्सवात गजानन स्वामींनी लोकमान्य टिळकांचे राष्ट्रप्रेम पाहून शुभआशीर्वाद देतात व पुढे 'लोकमान्य' म्हणून ते अमर होतात. सोळाव्या अध्यायात भाऊ कंवरांच्या नैवेद्याची प्रतीक्षा करून गजानन स्वामींची भक्त वात्सल्यता दिसून येते. सतराव्या अध्यायात सर्वधर्म समभावाची शिकवण दिली आहे.

अठरांव्या अध्यायात बापूंना काळे या भक्ताला परमेश्वराविषयी तीव्र अशी ओढ होती. अशा खऱ्या भक्तांना भगवंत कोणत्याही रूपात दर्शन देण्यास सज्ज असतात हा बोध होतो.एकोणिसाव्या अध्यायात बाळाभाऊ या भक्ताला कर्म, भक्ती आणि योग या तिन्ही मार्गाचे महत्त्व समजावून सांगतात. तसेच गजानन स्वामी समाधी घेतल्यानंतर महाराज इथेचं राहतील आणि वेळोवेळी भक्तांना दर्शन देतील याची खात्री सुद्धा देतात.

संत सगुन देहाने इहलोकातून गेले तरी निगुर्णाने आज समाजात वावरत असतात. ते सुप्त शक्तीने सत्कर्मात सदाचारात अपार श्रद्धेतून ते असल्याची प्रचिती येते.

*मी गेलो ऐसे मानूं नका'*
*भक्तित अंतर करुं नका '*
*कदा मजलागी विसरुं नका'*
*मी आहे येथेचं'*

असे हे संत गजानन स्वामींचे शेवटचे आश्वासित वचन आहे.

■ ■ ■

# : आजचा गणेशोत्सव : धार्मिक की राजकीय?

गणेशोत्सवाचे दिवस म्हणजे भक्तीभावाचा, आनंदोत्सवाचा आणि एकोपा-बंधुत्वाचा काळ. प्रत्येक गल्लीत, प्रत्येक घरात विघ्नहर्त्याचे स्वागत करताना वातावरणात प्रसन्नता, मंगलमयता आणि भक्तिभाव पसरतो. गणपती बाप्पा मोरया या जयघोषाने हवेतील प्रत्येक अणूमणू सजीव झाल्यासारखा भासतो. जिथे गणेशाचे पूजन असते, तिथे श्रद्धेचे दीप प्रज्वलित होतात, मनात श्रद्धा, भक्ती व समाधानाचे तरंग उठतात. परंतु, या पवित्र उत्सवाकडे पाहताना एक प्रश्न मात्र अस्वस्थ करतो, आजचा गणेशोत्सव खऱ्या अर्थाने धार्मिक आहे का?, की तो राजकीय, स्वार्थी आणि दिखाऊ स्वरूपाचा झाला आहे?



----------------

**लोकमान्यांचा उदात्त हेतू**

गणेशोत्सवाचे सार्वजनिक स्वरूप म्हणजे टिळकांचे दैदिप्यमान योगदान. इंग्रजी सत्तेच्या काळात समाज विखुरलेला होता. जातिभेद, धर्मभेद, भीती आणि निराशा यामुळे लोक एकत्र येऊ शकत नव्हते. त्या काळात टिळकांनी गणेशोत्सवाला सार्वजनिक रूप दिले.

गणपतीच्या मूर्तीभोवती गावातील सर्वजण, जातीधमार्चे बंध विसरून एकत्र यावेत, सामाजिक सलोखा निर्माण व्हावा, परकीय सत्तेविरुद्ध एकतेची बीजे रुजावीत, हा होता टिळकांचा खरा हेतू. गणेशमूर्ती म्हणजे केवळ धार्मिक प्रतीक नव्हते; ते होते राष्ट्रीय एकतेचे, स्वातंत्र्यसंग्रामाचे दीपस्तंभ.

**गजानन कुसुम ओंकार हरणे**
**लेखक, कवी, साहित्यिक, वक्ता, समाजसेवक**
**खडकी, अकोला.**
**9822942623**

त्या काळी गणेशोत्सवात व्याख्याने, हरिकीर्तन, देशभक्तीपर कार्यक्रम, समाजजागृती करणारे उपक्रम आयोजित होत. मंदिरे भक्तिरसाने दुमदुमत असतानाच सभागृहात स्वातंत्र्याचे विचार घुमत. हा उत्सव म्हणजे भक्ती आणि बंधुता यांचे संगमस्थान होता.

**आजचे वास्तव : टिळकांचा हेतू विस्मरणात**

आज शंभर वर्षांनी या उत्सवाचे रूपांतर पाहिले तर मन विषण्ण होते. सार्वजनिक गणेशोत्सव म्हटला की पहिला टप्पा म्हणजे मंडळाची निवडणूक. अध्यक्षपद, कार्यकारिणी, जबाबदाऱ्या यावरून सुरू होणाऱ्या खोडसाळ स्पर्धा. जो निवडला गेला नाही तो नाराज; जो पदावर आला त्याला अहंकार. अशा वादातून उत्सवाच्या सुरुवातीपूर्वीच दुहीचे बी पेरले जाते.

नंतर सुरू होते वर्गणीचे पर्व. शासनाने नोंदणीकृत मंडळांनाच वर्गणी मागण्याचा अधिकार दिला आहे. पण प्रत्यक्षात हा नियम पाळला जातो का? घराघरांत जबरदस्ती, दुकाने-हॉटेलांवर दबाव, रस्त्यावर वाहनधारकांना अडवून उकळलेली रक्कम हा वर्गणीचा प्रकार आहे की खंडणी? हा प्रश्न सामान्य माणसाच्या मनाला चटका लावतो.

गरीब मजुराने, शेतकऱ्याने दोन वेळच्या भाकरीसाठी जपलेले पैसे देणे भाग पडते. विरोध केला तर शिव्यांचा भडिमार, धमक्या. हे दृश्य पाहून वाटते, हा गणेशोत्सव भक्तीचा आहे की भयाचा?

**वर्गणीचा उधळपट्टीत वापर**

ज्याच्या नावाने वर्गणी गोळा केली जाते, त्या गणपतीबाप्पाच्या पूजेसाठी किती पैसा खर्च होतो? आणि किती पैसा उधळपट्टी, अश्लाघ्य कार्यक्रम, दारूच्या पार्टी, डीजेच्या कर्णकर्कश आवाजात खर्च होतो? आज अनेक ठिकाणी गणेशोत्सव म्हणजे भक्तीचा नव्हे, तर डीजेचा जल्लोष, आर्केस्टाचा कोलाहल, फटाक्यांचा उधळपट्टी आणि बेकायदेशीर धिंगाणा.धार्मिक वातावरणाऐवजी नाचगाणी, भांडणे, दारूची मैफिल हे सर्व पाहून वाटते, गणपतीचा उत्सव की अधर्माचा मेळावा?

लोकमान्य टिळकांनी कल्पना केली होती की गणेशोत्सव हा समाजजागृतीचा मंच ठरेल. परंतु आज समाजोपयोगी कार्यक्रम, व्यसनमुक्ती मोहिमा, ज्ञानवर्धक व्याख्याने विरळाच दिसतात. उलट अशोभनीय कार्यक्रमच जास्त ठळकपणे दिसतात.

**उत्सव की विघ्न?**

गावोगावी गणेशोत्सव हा एकतेचा नव्हे तर दुहीचा कारणीभूत ठरत आहे. एका गल्लीत दोन गणपती, पण कारण धार्मिक नाही, तर राजकीय अहंकार. त्यांनी बसवला म्हणून आम्हीही बसवू हा स्पर्धेचा उन्माद.

मोठ्या स्पीकर्सचा आवाज, डीजेचा कर्णकर्कश गोंगाट, रात्रीभर नाचगाणी. आजारी रुग्ण, अभ्यास करणारे विद्यार्थी, वृद्ध मंडळी यांची कोणी पर्वा करत नाही. श्रद्धा व भक्तीचा उत्सव आज सहनशीलतेच्या कसोटीवर अपयशी ठरतो आहे.

**विसर्जन : भक्ती की विटंबना?**

गणेशोत्सवाचा शेवट म्हणजे विसर्जन. हा दिवस असावा भक्तीचा, कृतज्ञतेचा, विघ्नहर्त्याला भावपूर्ण निरोप देण्याचा. परंतु वास्तव काय? गणपतीला डोक्यावर न घेता ट्रॅक्टर-ट्रकवर डीजेच्या गजरात नेले जाते. ढोल-ताशे, दारूच्या पार्टी, गोंधळ, नाचगाणी या सर्वांमध्ये मूर्ती नदीत टाकली जाते. हे विसर्जन की विटंबना?

आपल्या घरी आलेल्या पाहुण्याला आपण जेवण घालतो, सन्मान करतो, पण शेवटी त्याला नदीत फेकून देतो का? मग गणेशबाप्पाला असे का? विसर्जनानंतर नद्यांत विटंबना झालेल्या मूर्ती पाहून मन खिन्न होते.

**पर्यावरणाचा विचार**

आज विज्ञानयुगात आपण प्रदूषण, पर्यावरण या विषयावर शिकतो, बोलतो. तरी गणेशोत्सवात प्लॅस्टिक व रंगीत मूर्तींचा वापर थांबत नाही. नद्यांत प्रदूषण वाढते, जलीय जीवांचा नाश होतो.

मातीच्या मूर्ती, घरगुती विसर्जन, पर्यावरणपूरक गणेशोत्सव, हा विचार आता तातडीने आत्मसात करावा लागेल. अन्यथा उत्सवाची पावित्र्यभूमी राखण्याऐवजी आपण पर्यावरणाचे पाप कमावतो.

**राजकारणाची सावली**

सार्वजनिक गणेशोत्सवाच्या ठिकाणी आज मोठ्या नेत्यांचे बॅनर, राजकीय कार्यक्रम दिसतात. उत्सव हा धार्मिक- सामाजिक न राहता राजकीय शक्तीप्रदर्शनाचा मंच झाला आहे. लोकमान्य टिळकांनी जो उदात्त हेतू ठेवला होता त्या हेतूची गळचेपी झाली आहे. गणेशोत्सव म्हणजे भक्ती, समाजसेवा आणि एकोपा. पण आजचा गणेशोत्सव म्हणजे सत्ता, स्वार्थ आणि स्पर्धा.

**काय करणे आवश्यक?**

आज प्रत्येकाला स्वतःला प्रश्न विचारावा लागेल, आपण गणेशोत्सव साजरा करतो आहोत की विटंबना करतो आहोत?

आपण वर्गणी समाजोपयोगी कामासाठी वापरतो का, की उधळपट्टीसाठी?

आपण गणेशबाप्पाला श्रद्धेने विसर्जन करतो का, की गोंधळाच्या गदारोळात टाकून देतो?

गणेशोत्सवाला पुन्हा धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक स्वरूप देण्यासाठी पुढील बाबी आवश्यक आहेत.

मातीच्या मूर्तींचा वापर, पर्यावरणपूरक विसर्जन. वर्गणीऐवजी स्वखुशीचे योगदान.

व्यसनमुक्ती, ज्ञानवर्धन, किर्तन समाजसेवा यांसारखे कार्यक्रम. डीजे, उधळपट्टी, अश्लाघ्य प्रकारांचा निषेध. गटबाजीऐवजी एकोपा, सहकार्य.

**निष्कर्ष..**

आज गणेशोत्सवाला १२५ वर्षांचा वारसा आहे. पण त्या वारशाचा आपण अपमान केला तर पुढील पिढ्यांना आपण काय देणार? गणेशोत्सव हा आनंदाचा, श्रद्धेचा, बंधुत्वाचा आणि समाजजागृतीचा राहावा हीच काळाची गरज आहे.

गणेशोत्सव पुन्हा धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक पावित्र्याने साजरा करण्यासाठी समाजाने सजग व्हावे, हेच लोकमान्य टिळकांच्या स्मृतीला खरे श्रद्धांजली ठरेल. गणपती बाप्पा मोरया!

■ ■ ■

# सार्वजनिक गणेशोत्सवामागील उद्देश आणि बदललेले स्वरूप!

मनुष्य हा मुळातच उत्सवप्रिय प्राणी असल्याने कोणताही आनंद इतरांसोबत साजरा करण्यात त्याला अधिक रुचि असते. त्यामुळे आपल्याकडे धार्मिक आणि राष्ट्रीय सण तसेच उत्सव अत्यंत उत्साहाने साजरे होतात.

नुकताच साजरा झालेला दहीहंडी उत्सव आणि त्याला प्राप्त झालेले व्यापक स्वरूप हा त्याचाच एक भाग आहे. लोकांच्या अतिउत्साहामुळे आणि धार्मिक शिक्षणाच्या अभावामुळे सध्या धार्मिक उत्सव साजरा करताना त्यामागील उद्देश विचारात घेतला जात नाही किंवा त्याला दुय्यम स्थान दिले जाते, परिणामी त्या उत्सवाचा केवळ इव्हेंट बनू लागला आहे. दहीकाला उत्सवाचे तेच झाले आहे आणि सार्वजनिक गणेशोत्सव सुद्धा हळूहळू त्या दिशेने वाटचाल करू लागला आहे.

आजमितीला सार्वजनिक गणेशोत्सव केवळ मुंबई, ठाणे आणि पुणेपुरता मर्यादित राहिला नसून राज्यातील सर्वात मोठा उत्सव बनला आहे. देशातील अनेक राज्यांतही तो उत्साहाने साजरा होऊ लागला आहे. यानिमित्ताने राज्याच्या अर्थकारणात दरवर्षी मोठ्या प्रमाणात उलाढाल होत असते.



**जगन घाणेकर**
**घाटकोपर, मुंबई.**
**९६६४५५९७८०**

शहरासारख्या ठिकाणी या दिवसांत एवढ्या मोठ्या प्रमाणात भाविकांची वर्दळ असते की कधी रात्र सुरु झाली आणि कधी संपली याचा पत्ताही लागत नाही. शहरातील सार्वजनिक गणेशोत्सवाची मजा लुटण्यासाठी देश विदेशातून भाविक आणि पर्यटक मोठ्या प्रमाणात शहरांत दाखल होतात.

देशाच्या सीमा ओलांडून साता समुद्रापार ज्या ज्या ठिकाणी मराठी माणूस वसला आहे त्या त्या ठिकाणी सार्वजनिक गणेशोत्सव आज साजरा होऊ लागला आहे. मुळात कुटुंबातील मंडळींनी एकत्र येऊन साजरा करायचा एक सण असलेली श्री गणेशचतुर्थी सार्वजनिक उत्सव कशी बनली, हे समजून घेऊया.

सार्वजनिक गणेशोत्सवाचे प्रणेते म्हणून लोकमान्य टिळक यांना ओळखले जाते. एकदा लोकमान्य टिळकांनी ह.भ.प. श्रीपतीबुवा भिंगारकर यांना विचारले, ह्यमी स्वराज्यप्राप्तीसाठी प्रयत्न करीत आहे; पण ईश?वरी साहाय्यावाचून कोणतेही कार्य शेवटास जात नाही. तेव्हा या स्वराज्याच्या कार्याचा राष्ट्रभर प्रसार होण्यासाठी कोणाची आराधना करावी?

बुवा म्हणाले, तुम्ही श्री गणपतीची पार्थिव पूजा चालू करा, म्हणजे तुमचे सर्व हेतू सिद्धीस जातील. त्यावर लोकमान्य टिळक म्हणाले, मी एकट्याने अशी पूजा करून भागणार नाही. राष्ट्रभर ती सर्वांनी केली पाहिजे.

आपल्याकडे भाद्रपद शुद्ध चतुर्थीस घरोघर पार्थिव गणपतीची पूजा करायचा पूर्वीचा प्रघात आहेच. तो आता राष्ट्रभर चालू करूया. तेव्हापासून लोकमान्यांच्या प्रेरणेने सार्वजनिक गणेशोत्सव चालू झाला ! यावरून सार्वजनिक गणेशोत्सव चालू होण्यामागील मूळ प्रेरणा राष्ट्रहित आणि ईश्वरभक्ती ही आहे, हे स्पष्ट होते.

सार्वजनिक गणेशोत्सव चालू करण्यामागील आपले उद्देश कोणते आहेत, हे लोकमान्य टिळकांनी तेव्हाच एका भाषणात स्पष्ट केले. वर्ष १८९४ मध्ये झालेल्या त्यांच्या भाषणाचा सार म्हणजे धर्मजागृती, राष्ट्रजागृती आणि पाश्चिमात्य संस्कृतीच्या आक्रमणाचा विरोध, हे सार्वजनिक गणेशोत्सव चालू करण्यामागील मुख्य उद्देश होत.

आता मनात प्रश्न येतो की, हे उद्देश आज कालबाह्य झाले आहेत का? सध्या किती ठिकाणी या उद्देशांना अनुरूप ठरेल, अशा प्रकारे हा उत्सव साजरा केला जात आहे? आज अनेक ठिकाणी गणेशोत्सवासाठी वर्गणी काढताना जबरदस्ती केली जाते. काहींची आर्थिक क्षमता नसताना समाजात इतरांसोबत राहायचे म्हणून त्यांना पदरमोड करून वर्गणी द्यावी लागते.

काही ठिकाणी मंडळातील कार्यकर्ते हा समजूतदारपणा दाखवतात; मात्र काही ठिकाणी नागरिकांना वर्गणी देण्यासाठी त्रास दिला जातो हे नाकारता येणार नाही. वर्षागणिक निरनिराळी मंडळे स्थापन होऊ लागली आहे. शहरांत १००मीटरच्या परिसरातही २-३ मंडळे स्थापन झालेली पाहायला मिळतात.

जवळजवळच्या मंडळांमध्ये सजावट, गणेश मूतीर्ची उंची, उत्सवानिमित्त ठेवण्यात आलेले कार्यक्रम, आगमन-विसर्जन मिरवणूका अशा वेगवेगळ्या कारणांमुळे भांडणे होताना पाहायला मिळतात. ज्या ठिकाणी भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी जमते अशा मंडळांच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्सवादरम्यान भलताच उत्साह संचारलेला असतो.

या उत्साहाच्या भरात आलेल्या भाविकांशी वाद घालणे, त्यांना शिवीगाळ करणे असले प्रकार या काळात हल्ली बातम्यांमध्येही पाहायला मिळू लागले आहेत. भाविकांना आकर्षित करण्यासाठी मंडपात उंच गणेशमूर्ती बसवली जाते; मात्र अनंत चतुर्दशीला तिचे पूर्ण विसर्जन न करताच कार्यकर्त्यांकडून पळ काढला जातो. ज्या गणेशमूर्तीची १० दिवस मनोभावे पूजा केली जाते, त्याच मूर्तीची पुढे अवहेलना होते.

सजावट, विद्युत रोषणाई यांवर अमर्याद खर्च केला जातो. मिरवणुकांमध्ये मंगलवाद्ये वाजवण्याऐवजी अथवा सात्विक गाणी किंवा भजने लावण्याऐवजी जीवघेणा डीजे लावून त्यावर चित्रविचित्र अंगविक्षेप करत नृत्य केले जाते. आगमन विसर्जन मिरवणुकीत सहभागी होणाऱ्यांकडून काही ठिकाणी मद्यपान केले जाते. सार्वजनिक गणेशोत्सवाचे निमित्त करून काही ठिकाणी गणेश मंडपातच रात्री जुगाराचा डाव बसतो.

या दिवसांत विधायक आणि समाजोपयोगी प्रबोधनात्मक कार्यक्रम ठेवण्याऐवजी काही ठिकाणी लावणी अथवा चित्रपट संगीताचे कार्यक्रम ठेवले जातात. या कालावधीत गणेश मंडपातील वातावरण सात्विक राहण्यासाठी सुमधुर भजने अथवा गणरायाची गाणी, स्तोत्र लावण्याऐवजी कर्णकर्कश आवाजात चित्रपट गीते लावली जातात. आरत्या म्हणताना त्या मंजुळ आवाजात न म्हणतात आरडाओरड करत म्हटल्या जातात. मंडपात स्वच्छता ठेवली जात नाही.

श्री गणेशाच्या हा उत्सव सार्वजनिक असला तरी तो धार्मिक उत्सव आहे. राष्ट्रकार्याला धार्मिक अधिष्ठान असावे आणि त्यातून राष्ट्रजागृतीचा संदेश लोकांपर्यंत पोहोचावा या उद्देशाने लोकमान्य टिळकांनी हा उत्सव सुरु केला. आजमितीला हा उद्देश लोप पावून उत्सवात अपप्रवृत्ती शिरल्या आहेत.

अर्थात वर नमूद केलेले प्रकार हे काही ठिकाणीच पाहायला मिळत असले तरी ते आपल्या धार्मिक उत्सवाला गालबोट लावणारे असल्याने ते थांबायला हवेत. आज हिंदूंमध्ये धर्मशिक्षणाचा अभाव असल्याने उत्साहाच्या भरात ते काय करत आहेत हे त्यांच्याच लक्षात येत नाही.

आपल्या उत्सवात शिरलेल्या या चुकीच्या प्रथांना उखडून उत्सव सात्विक आणि लोकहिताचा व्हावा यासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न करण्याची आज नितांत आवश्यकता आहे.

■ ■ ■

# देहावसान

प्रा. डॉ. लोपा मेहता, या मुंबईतील जी एस मेडिकल कॉलेजमध्ये प्राध्यापिका होत्या, आणि त्यांनी तेथील एनॅटॉमी विभाग प्रमुख म्हणून कार्य केले. ७८ व्या वर्षी त्यांनी लिव्हिंग विल तयार केले. त्यामध्ये स्पष्ट लिहिले आहे,

जेव्हा शरीर साथ देणे बंद करेल, आणि सुधारण्याची कोणतीही शक्यता उरणार नाही, तेव्हा माज्यावर उपचार करू नयेत. ना व्हेंटिलेटर, ना ट्यूब, ना रुग्णालयातील निरर्थक धावपळ. माझा शेवटचा काळ शांततेत जावा, जिथे उपचारांच्या हट्टापेक्षा समजूतदारपणाला प्राधान्य असेल.



डॉ. लोपा यांनी केवळ हा दस्तऐवजच लिहिला नाही, तर मृत्यूविषयी एक संशोधन-पत्रही प्रकाशित केले. त्यात त्यांनी मृत्यू ही एक नैसर्गिक, निश्चित आणि जैविक प्रक्रिया आहे, असे स्पष्ट केले आहे.

त्यांचा मुद्दा असा की, आधुनिक वैद्यकशास्त्राने मृत्यूला स्वतंत्र संकल्पना म्हणून कधी पाहिलेच नाही. वैद्यकशास्त्राचा आग्रह असा राहिला, की मृत्यू नेहमी एखाद्या आजारामुळेच येतो, आणि जर आजारावर इलाज झाला, तर मृत्यू रोखता येतो.

पण शरीराचे विज्ञान त्याहून खूप खोल आहे. त्यांचा युक्तिवाद असा आहे,

शरीर हे अखंड चालणारे यंत्र नाही. ते एक मर्यादित प्रणाली आहे, ज्यात ठराविक जीवनशक्ती असते.

ही ऊर्जा कुठल्यातरी टाकीमधून मिळत नाही, तर सूक्ष्म शरीरामार्फत मिळते. हेच ते सूक्ष्म शरीर, ज्याचा अनुभव प्रत्येकाला येतो, पण जो दिसत नाही. मन, बुद्धी, स्मृती आणि चेतना, या सगळ्यांनी मिळून बनलेली ही प्रणाली आहे. हे सूक्ष्म शरीर म्हणजे जीवनशक्तीचा प्रवेशद्वार आहे. ही ऊर्जा संपूर्ण देहात पसरते, आणि शरीर जिवंत ठेवते. हृदयाची धडधड, पचनक्रिया, विचार करण्याची क्षमता. हे सगळे तिच्या आधारावर चालते.

पण ही शक्ती अमर्याद नाही. प्रत्येक शरीरात तिचे एक ठराविक प्रमाण असते. जसे एखाद्या यंत्रात बसवलेली फिक्स्ड बॅटरी. ना वाढवता येते, ना कमी करता. जितकी चावी भरली रामाने, तितके चालेल खेळणे....असा प्रकार.

डॉ. लोपा लिहितात, की जेव्हा शरीरातील ही उर्जा संपते, तेव्हा सूक्ष्म शरीर देहापासून वेगळे होते. तोच क्षण म्हणजे देह स्थिर होतो, आणि आपण म्हणतो, प्राण गेले.

ही प्रक्रिया ना आजाराशी संबंधित असते, ना कुठल्या चुकांशी. ही शरीराची अंतर्गत लय आहे, जी गर्भातच सुरू होते, आणि पूर्ण होऊन मृत्यूला पोहोचते.

या ऊर्जेचा खर्च प्रत्येक क्षणी चालतो, प्रत्येक पेशी, प्रत्येक अवयव आपला जीवनावधी संपवतो. आणि जेव्हा संपूर्ण देहाचे कोटे पूर्ण होतात, तेव्हा शरीर शांत होते.

मृत्यूचा क्षण हा घड्याळाने मोजलेला नसतो. तो एक जीवनशास्त्रीय वेळ असतो, जो प्रत्येकासाठी वेगळा. कुणाचे जीवन ३५ वर्षांत पूर्ण होते, तर कुणाचे ९० वर्षांत. पण दोघेही आपली पूर्ण वाटचाल करतात.

जर आपण त्याला पराभव किंवा जबरदस्ती मानले नाही, तर कुणीही अपुरे मरत नाही. डॉ. लोपा यांच्या मते आधुनिक वैद्यकशास्त्र जेव्हा मृत्यू टाळण्याचा हट्ट धरते, तेव्हा केवळ रुग्णाचे शरीरच नाही तर संपूर्ण कुटुंब थकते. आयसीयु मधील महिनाभराची श्वासोच्छवासाची किंमत कधी कधी आयुष्यभराच्या बचतीला नेस्तनाबूत करते. नातेवाईक म्हणत राहतात, अजून आशा आहे, पण रुग्णाचा देह कधीच सांगून गेलेला असतो...आता पुरे.

**: सौजन्य :**
**नमिता चोपकर**
**प्रभाग मित्र, नागपूर.**

म्हणूनच त्या लिहितात. जेव्हा माझी वेळ येईल, तेव्हा फक्त मला केईएम रुग्णालयात घेऊन या. जिथे मला खात्री आहे, की अनावश्यक हस्तक्षेप होणार नाही. उपचारांच्या नावाखाली दूरगामी त्रास दिला जाणार नाही. माझ्या शरीराला रोखले जाणार नाही...त्याला जाऊ द्या.

पण प्रश्न हा आहे, आपण आपल्यासाठी असे काही ठरवले आहे का? आपले कुटुंब त्या इच्छेचा मान ठेवेल का? आणि जे मान ठेवतील त्यांना समाजात मान मिळेल का? आपल्या रुग्णालयांत अशा इच्छेचा सन्मान आहे का, की अजूनही प्रत्येक श्वासावर बिल होणार आणि प्रत्येक मृत्यूवर दोषारोप?

हे इतके सोपे नाही. तर्क आणि भावना यांचा समतोल साधणे कदाचित सर्वात कठीण काम आहे. जर मृत्यूला आपण शांत, नियत आणि शरीराच्या अंतर्गत गतीतून आलेली प्रक्रिया म्हणून पाहायला शिकलो, तर कदाचित मृत्यूची भीती कमी होईल, आणि डॉक्टरांकडून असलेल्या अपेक्षा जास्त वास्तववादी होतील.

माझ्या मते, मृत्यूशी लढणे थांबवायला हवे आणि त्याआधी जगण्यासाठी तयारी करायला हवी. आणि जेव्हा तो क्षण येईल, तेव्हा शांतपणे, सन्मानाने त्याला सामोरे जावे.

बुद्धांच्या भाषेत....मृत्यू म्हणजे जीवनाच्या प्रवासातील पुढचा टप्पा आहे.

■ ■ ■

## असे करावे ऋषीपंचमीचे व्रत

**वाचक लिहितात**


मनुष्य आणि देवता यांना जोडणारा दुवा म्हणजे ऋषी. तपस्येमुळे त्यांना वैराग्य आणि अध्यात्मिक ज्ञान मिळते वर्षभरात झालेले स्पर्शास्पर्श, शौच-अशौच याचा मनुष्य तसेच वास्तूवर अनिष्ट परिणाम होतो. ऋषिपंचमीच्या व्रतामुळे हे परिणाम नष्ट होण्यास मदत होते.

ऋषीपंचमीच्या दिवशी कश्यप, अत्रि, भरद्वाज, विश्वामित्र, गौतम, जमदग्नी, वशिष्ठ या सप्तर्षींचे तसेच वशिष्ठ ऋषींची पत्नी महातपस्विनी अरुंधती यांचे पूजन करतात. पूजनासाठी पाटावर तांदळाचे आठ ढीग करतात.

त्यावर सप्तर्षी आणि अरुंधती यांचे प्रतीक म्हणून आठ सुपाऱ्या ठेवतात. तुळस, आघाडा, बेल, शमी, रुई, धोत्रा यांची पत्री अर्पण करून सप्तर्षी व अरुंधती यांचे पूजन करतात.

■ **दिपाली गिते**
**सातारा.**

# मग लठ्ठपणा कसा कमी होणार?



देशासमोर वजन वाढीचे, लठ्ठपणाचे मोठे संकट उभे ठाकले आहे. त्यामागे जंक्स फुड्सच नाही तर बदलेली जीवनशैली सुद्धा कारणीभूत ठरली आहे. कमी झालेली शारिरिक हालचाल, ताणतणाव आणि झोपेचे बिघडलेले गणित यामुळे लठ्ठपणा वाढत असल्याचे समोर आले आहे.

लठ्ठपणा ही केवळ शारीरिक समस्या नाही तर अनेक आजारांचे मूळ कारण आहे. त्यातच लग्न आणि इतर समारंभात बुफे जेवणाचे लोण ग्रामीण भागापर्यंत पोहचले आहेत. त्यातील ही एक चूक अनेकांच्या लठ्ठपणासाठी कारणीभूत ठरली आहे.

**ही चूक लठ्ठपणाला आमंत्रण**

भारतीय संस्कृतीत जमिनीवर मांडी घालून जेवण करण्याची पद्धत आहे. त्यामुळे अन्न पचण करण्यास मदत होते. जमिनीवर बसून प्रार्थना केल्यानंतर जेवणाला सुरुवात करण्यात येते. पण आजकालच्या बुफे पद्धतीमुळे उभं राहुन जेवण करावे लागते. या पद्धतीमुळे पचनक्रियेवर परिणाम होतो. आणि वजन वाढण्याची शक्यता बळावते.

**लठ्ठपणामुळे लवकर येतो थकवा**

लठ्ठपणामुळे शरीरात अनेक समस्या तयार होतात. लठ्ठ व्यक्ती कोणतेही काम केल्यानंतर लगेच थकते याशिवाय अशा व्यक्तीला लवकर धाप लागते. सांधेदुखीचा आणि आत्मविश्वास डळमळीत होण्याचा त्रास जाणवतो. लठ्ठपणामुळे मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयविकाराचा झटका आणि इतर गंभीर आजारांचा धोका वाढतो.

फास्टफूड पदार्थ, पॅकेटबंद पदार्थ, मायक्रोवेव्हमधील अन्न आणि फ्रीजमधील शीळे अन्न हे आरोग्यासाठी उपायकारक मानल्या जाते.

तर वाईट व्यसनं, रात्री उशीरा जागरण, सकाळी उशीरा उठणे, सतत बसून राहणे, व्यायामाचा अभाव, वाईट सवयींमुळे लठ्ठपणा वाढतो.

**लठ्ठपणा असा घालवा**

लठ्ठपणा घालवण्यासाठी अगोदर जीवनशैलीत मोठे बदल करणे आवश्यक आहे. सकाळी लवकर उठा, रात्री लवकर झोपा, सयंत जीवनशैली अंगीकार करा. व्यायामवर जोर द्या.

योग्य आणि सकस आहार करा. फळे, हिरव्या पालेभाज्या, कडधान्य आणि प्रथिने असलेल्या अन्न पदार्थांचा रोजच्या आहारात समावेश असावा. तळलेले पदार्थ, प्रिझर्व्हर्ड पदार्थ, पेय टाळा


नियमित व्यायाम करा. किमान रोज 30 मिनिटे चाला अथवा धावा. सायकल चालवा. योग, प्राणायम करा. कसरत करा.

ताणतणाव टाळा, हास्यविनोदाकडे वळा. पुस्तक वाचण वाढवा. झोपेची, सकाळी लवकर उठण्याची आणि जेवणाच्या वेळा पाळा. मोबाईल,टीव्हीत अधिक रमू नका. पुरेशी आणि गाढ झोप महत्त्वाची आहे. त्यामुळे लठ्ठपणा वाढणार नाही, याकडे कटाक्षाने लक्ष पुरवा, स्वस्थ राहा.

■ ■ ■

## अशोकायन

**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**



### मी आहे ना पाठीशी!

**सत्ता आहे आपली**
**लाग आता कामाशी**
**काही झाले तुला तर**
**मी आहे ना पाठीशी ..!**

**तोंडीच सांगतो बाबू**
**लेखी देणार नाही**
**आलं प्रकरण अंगावर**
**तर काही होऊ देणार नाही ..**

**नियमात बसव लेका**
**बाकीचं मी बघतो**
**खुर्चीचा काय भरवसा**
**चाल हात धुवून घेतो ..!**

# देशी,विदेशी दारू चा २३ हजार ९१० रु चा मुद्देमाल जप्त

**अकोला :** अर्चित चांडक, पोलीस अधीक्षक, अकोला यांचे निर्देशाप्रमाणे अकोला जिल्हयामध्ये अवैध धंदे समूळ नष्ट करण्यासाठी ऑपरेशन प्रहार मोहीम राबविण्यात येत आहे.पोलीस स्टेशन पिंजर हद्दीत जझ महान अन्तर्गत ग्राम सर्किणी येथे एका बंद खोलीत देशी दारू ठेवली असले बाबत मिळालेल्या गुप्त बातमीवरून स्टाफसह पंचांना सोबत घेऊन सदर ठिकाणी छापा घातला असता सदर ठिकाणी देशी दारू सखुसंत्राच्या ९० चङ चे ५ बॉक्स मध्ये एकूण ५०० दारूच्या बाटल्या प्रत्येकी किंमत ४० रुपये प्रमाणे किंमत २०,००० रुपये व इम्पेरियल ब्ल्यू कंपनीच्या २३ बाटल्या किंमत १७० रुपये असे ३९१० रुपये असा एकूण २३९१० रुपयाचा मुद्देमाल आरोपी उमेश कोल्हे राहणार सारकिनी याचे बंद खोलीतून जप्त केला.



# उमा बॅरेज महाघोटाळा! ९ कोटींच्या भ्रष्टाचाराने प्रशासन हादरले

## लोकप्रतिनिधी गप्प का?

**अकोला,दि २७ (प्रतिनिधी) :** अकोल्यातील उमा बॅरेज प्रकल्पातील तब्बल ९ कोटी रुपयांचा महाघोटाळा उघड झाल्याने संपूर्ण जिल्ह्यात प्रचंड खळबळ माजली आहे. विदर्भ पाटबंधारेविकास महामंडळाच्या अकोला सिंचन मंडळातील तत्कालीन चार वरिष्ठ अधिकारी व तीन कंत्राटदार अशा ७ जणांविरुद्ध कलम ४०६, ४०९, ४१७, ४२०, ४६८, ४७१, १२०(ब) भा.द.वि. १८६० अंतर्गत गंभीर गुन्हा दाखल झाला आहे.गौरव प्रकाशराव बोबडे (सहाय्यक अभियंता) यांच्या तक्रारीवरून हा गुन्हा नोंदविला असून, दि. ०१ मार्च २०११ ते ३१ मार्च २०१२ दरम्यान उमा बॅरेज प्रकल्पातील सरळ उचल पद्धतीच्या द्वारनिर्मिती व उभारणीच्या कामात करारनाम्यानुसार अतिप्रदान करून शासनाला कोट्यवधींचे नुकसान पोहोचविण्यात आल्याचा धक्कादायक आरोप आहे.या प्रकरणाचा तपास अकोला आर्थिक गुन्हे शाखेकडे वळिवण्यात आला असून, ठाणेदार गणेश नावकार यांच्या मार्गदर्शनाखाली चौकशी सुरू आहे. दरम्यान, सूत्रांच्या माहितीनुसार, या घोटाळ्याची रक्कम ९ कोटींवरून अधिक असण्याची शक्यता वर्तविली जात आहे.तालुक्यातील इतक्या प्रचंड भ्रष्टाचारानंतरही कोणत्याही आमदार, खासदार किंवा स्थानिक नेत्यांकडून एकही ठोस भूमिका दिसत नाही, यावर नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. या प्रकरणावर शासनाचे लक्ष वेधले जाईल का, दोषींवर कठोर कारवाई होईल का, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे डोळे लागले आहेत. तालुक्यातील सर्वात मोठा आर्थिक घोटाळा उघड झाल्याने प्रशासन हादरले असून, शासनाची कसोटी लागणार आहे.यामध्ये आणखी कोण-कोण सामील आहे याचा उलगडा पुढील तपासानंतरच होणार असला, तरी या घोटाळ्याने अकोल्यातील पाटबंधारे विभागावर मोठे प्रश्नचिन्ह उभे केले आहे.



खा. अनुपजी धोत्रे यांचे घरी गणेशाची स्थापना



बाळासाहेब नेरकर यांचे घरी गणेश वदंन



भाजपा कार्यालयात श्री गणेश स्थापना



आमदार रणधिरभाऊ सावरकर यांचे घरी

# ग्रामगीता म्हणजे जीवन जगण्याची कला: ह.भ.प.श्रद्धाताई ठाकरे

**अकोला,दि २७ (प्रतिनिधी) :** ग्रामगीता हा ग्रंथ म्हणजे जीवन शिक्षणाची ज्ञानगंगा आहे. इतकेच नाही तर ग्रामगीता म्हणजे जीवन जगण्याची कला आहे असे प्रतिपादन ह.भ.प.श्रद्धा ठाकरे यांनी केले. हनुमान मंदिर गुरुकुल मलकापूर अकोला येथे श्री गुरुदेव महिला सेवा मंडळाचे वतीने श्रावण मासानिमित्त ग्रामगीता ग्रंथ वाचनाचे समारोप प्रसंगी बोलत होत्या.

ग्रामगीता ग्रंथ वाचक उषाताई गोटे, सविता शेळके ,शालिनी देशमुख, वैशाली साळवे ,साधना मुने, नितीन कोहाडे, साधना उगले, अनिता सिंह, सुनंदा भेले ,वत्सला पाटेखेडे , श्रीमती विमल शिंदे, स्वाती पाटखेडे, गोवर्धन खवले, एडवोकेट वंदन कोहाडे,संजय वाघमारे, बंडूभाऊ शेळके, वसंत सिंह, माणिकराव काजे यांनी श्रावण मासात ग्राम गीता वाचन केले. समारोपीय निरूपण ग्रामगीताचार्य रामराव पाटेखेडे यांनी केले. प्रख्यात कीर्तनकार ह.भ.प.प्रा.डॉ.प्रशांत महाराज ठाकरे यांच्या मार्गदर्शनात वारकरी संप्रदाय कीर्तन विद्यालया चा बाल कीर्तनकार शिवानद महाराज तायवाडे यांनी कीर्तनातून उपस्थिताणची मने जिंकली. त्यांना बाल कलावंतांनी साथसंगत दिली. ह.भ.प. प्रा. डॉ. प्रशांत महाराज ठाकरे यांनी ग्रामगीतेवर उद्बोधन केले. डॉ. मनीषा पालीवाल यांनी पर्यावरण समस्या विषयी माहिती दिली. महाराष्ट्र नशाबंदी मंडळाचे जिल्हा संघटक प्रा.बबनराव कानकिरड यांनी उपस्थिताना व्यसनमुक्तीचा संदेश दिला. या प्रसंगी मंदिर परिसरात व्यसनमुक्ती प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रामराव पाटेखेडे यांनी केले. आभार प्रदर्शन ग्रामगीताचार्य सौ. नूतन कोहाडे यांनी केले. राष्ट्रवंदनेने कार्यक्रमाची सांगता झाली. सर्वश्री एडवोकेट वंदन कोहाडे ,श्रीकृष्ण दादा ठोंबरे,रामरतन घावट, भुजंगराव देशमुख ,संजय वाघमारे, सुरेश फाळके,दिगंबर काकडे, मुक्ता वाघमारे, नम्रता सातव, इंदिरा धुमाळे, सीता पालवे,कुसुम सरोदे, निर्मला गवई,विमल म्हैसने,रामचंद्र महाले, जानराव भोंडे,विष्णुपंत गोटे, वसंतराव भाकरे , अमिष पाटेखेडे, पंकज गव्हाणकर श्रीधर सरोदे रोशन गावंडे श्रीपाद खेडकर, राजुभाऊ क्षिरसागर,महादेव गव्हाणकर, प्रकाश गायकवाड, यादवराव काकड, बंडू शेळके, अशोक राऊत ,भीमराव वाघ, प्रशांत राठोड, देविदास गावंडे व भास्करराव भेले यांचे सह सर्वोदय मंडळ, नशाबंदी मंडळ,श्री गुरुदेव सेवा मंडळाचे कार्यकर्ते व नागरिकांची उपस्थिती होती.



### राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त ३ दिवसीय क्रीडा महोत्सवाचे आयोजन

# २९ ते ३१ ऑगस्ट दरम्यान विविध स्पर्धा, रॅली,व्याख्याने व खेळाडूंचा सत्कार

**अकोला,दि २७ (प्रतिनिधी) :** हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या जन्मदिनी साजरा होणाऱ्या राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त अकोला जिल्ह्यात २९ ते ३१ ऑगस्ट २०२५ दरम्यान तीन दिवसीय क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यासंदर्भात तयारीसाठी आमदार रणधीर सावरकर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयात बैठक घेण्यात आली. या क्रीडा महोत्सवाचा शुभारंभ २९ ऑगस्ट रोजी सकाळी ७.३० वाजता रॅली आणि उद्घाटन समारंभाने होणार असून, पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर आणि खासदार अनुप धोत्रे यांच्या हस्ते या कार्यक्रमाचे उद्घाटन होईल. यानंतर विविध खेळांचे प्रदर्शनी सामने होतील. संध्याकाळी ६.३० वाजता राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पदक विजेते खेळाडूंचा सत्कार करण्यात येणार आहे. ३० ऑगस्ट रोजी मॅरेथॉन स्पर्धा, विविध खेळांचे सादरीकरण तसेच 'ऑलिंपिक स्पर्धेमधील अकोल्याचे योगदान' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये विद्यार्थी, खेळाडू आणि नागरिकांसाठी माहितीपूर्ण सत्र आयोजित होईल. ३१ ऑगस्ट रोजी सकाळी सायकल रॅली, विविध खेळांचे प्रदर्शन तसेच ङ्कस्पोर्ट्स आणि फिजिकल फिटनेसचे महत्त्वङ्क व ङ्कसी.पी.आर.ङ्क या विषयांवर व्याख्यानमालेचे आयोजन होणार आहे. या संपूर्ण कार्यक्रमाच्या आयोजनासाठी आणि अडचणी दूर करण्यासाठी आमदार रणधीर सावरकर यांनी विविध सूचना दिल्या.

# कुटासा फाटा ते कुटासा मार्ग ठप्प : रेल्वे पुलाखाली पाणी साचल्याने नागरिकांना मनस्ताप

**कुटासा :** कुटासा फाटा ते कुटासा या मार्गावरील रेल्वे पुलाखाली पाण्याचा निचरा योग्य पद्धतीने न झाल्याने पुलाखाली पाणी साचले असून संपूर्ण रस्ता वाहतुकीसाठी बंद पडल्याने परिणामी, पुलाच्या दोन्ही बाजूंना वाहनांच्या लांबलचक रांगा लागल्या आहेत. अचानक मार्ग बंद झाल्याने नागरिक आणि वाहनधारकांना मोठ्या प्रमाणात मनस्ताप सहन करावा लागत आहे.

दरम्यान, आज गणपती बाप्पाच्या आगमनाचा दिवस असल्याने गावात उत्साहाचे वातावरण असतानाच या वाहतूक कोंडीमुळे ग्रामस्थांना मोठा त्रास झाला. अनेकांनी बाप्पाच्या आगमन मिरवणुकीसाठी वेळेवर पोहोचण्याचे नियोजन केले होते, मात्र रस्ता बंद झाल्याने ते हवालदिल झाले.



# जगदुध्दाराच्या इच्छेसह सामर्थ्य संपन्न संत : योगी सम्राट गजानन महाराज

## : भागवताचार्य ज्ञानेश्वरमहाराज वाघ

**अकोला,दि २७ (प्रतिनिधी) :** या पृथ्वीतलावर जीव , देव आणि संत हे तिन्ही मनुष्य रूपानेच विचरन करीत असतात.पैकी जीवाच्या अंतःकरणामध्ये इच्छांचा महापूर असतो परंतु त्या पूर्ण करण्याच्या दृष्टिकोनातून सामर्थ्याचा मात्र अभाव असल्यामुळे , तो जगदोद्धार तर दूरच दूर आत्मोद्धार करण्याकरिता सुद्धा पूर्णतः असमर्थ असतो. देवामध्ये केवळ संकल्प मात्राने सृष्टी उत्पन्न करण्या एवढे सामर्थ्य असते.

परंतु त्या सृष्टीतील सर्वांचाच उद्धार करण्याच्या इच्छेचा मात्र त्यात अभाव असल्याने तो केवळ 'आपुल्या पाळीशी भक्त जना श्रश्र' याप्रमाणे आपल्यांचाच उद्धार करतो. परंतु योगी सम्राट गजानन महाराजां सारखे संत मात्र उपरोक्त दोन्ही पेक्षा वेगळे असून ; अवतार तुम्हां धराया कारण श्र उध्दरावे जन जड जीव हि जगदुद्धाराची तीव्र इच्छा धारण करूनच या अवनीतलावर अवतीर्ण होत असतात. तसेच ते कर्तूमब , अर्तुमब व अन्यथा कर्तूमब शक्ती संपन्न असल्यामुळे देवाने संकल्पाने निर्माण केलेल्या सृष्टीचा स्व-सामर्थ्याने उद्धार करतात. म्हणूनच भक्तजन आजही ' गजानना अवलिया अवतरले जगताराया श्र ' अश्या प्रकारच्या भजनांमधून त्यांचे गुणगान करून आराधना करीत असतांना दिसतात.

संतांमध्ये युक्त व युंजान असे मुख्य दोन भेद असून ; त्यात अनेक जन्म साधना करून जे मुक्त झाले ते युंजान भक्त व जे स्वभावता मुक्तच असतांना केवळ जगदोद्धारार्थ स्वेच्छेने या पृथ्वीतलावर अवताराला येतात त्यांना युक्त महात्मे असे म्हणतात. योगी सम्राट गजानन महाराज हे युक्त संत असल्या मुळेच त्यांनी आपल्या अवतार कालखंडात जो अनेकानेक भक्तांना अनुग्रहीत करून त्यांचा उद्धार केला. त्यापैकी प्रमुख भक्त म्हणजे नागपूरचे श्रीमंत रघुजीराजे भोसले यांचे मातब्बर सरदार श्रीयुत कर्ताजीराव पाटील जायले यांना स्वप्नात श्रीफळ देऊन पुत्रप्राप्तीचा आशीर्वाद दिला.



# संपूर्ण वंदे मातरम गीत म्हणून भारतीय स्वातंत्र्याची शौर्यगाथा अवतरली अकोला नगरीमध्ये






**अकोला,दि २७ (प्रतिनिधी) :** भारतीय स्वातंत्र्याचा सुवर्ण महोत्सवाच्या पावन पर्वावर श्री राजराजेश्वर नगरीत हुतात्मा स्मारक, नेहरु पार्क अकोला येथे ; ७९ वा स्वातंत्र्य दिनानिमित्त 'हिंदू राष्ट्र समन्वय समिती' च्या वतीने क्रांतिकारकांचे फ्लेक्स प्रदर्शन लावून आणि संपूर्ण वंदे मातरम म्हणून संपन्न झाला.कार्यक्रमाची सुरुवात भारत माता यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली .त्यानंतर श्री आनंद जहागीरदार यांचे सोबत एकत्रितपणे संपूर्ण वंदे मातरम म्हणण्यात आले. हिंदुराष्ट्र समन्वय समितीचे अकोला संयोजक श्री उदय जी महा यांनी कार्यक्रमाचा उद्देश सांगितला तर सहसंयोजक श्री योगेश अग्रवाल यांनी सन्माननीय पाहुण्यांचे स्वागत केले.हिंदू जनजागृती समिती अकोला चे श्री अमोल वानखडे म्हणाले भारत हजारो वर्षापासून धर्म व राष्ट्र यावर आघात सहन करत आहे. संपूर्ण सनातन धर्माच्या उद्धाराचे कार्य आदी शंकराचार्यांनी आठव्या शताब्दीत केले त्यांचे छायाचित्र , विजयनगर सम्राट राजा कृष्णदेवराय यांचे छायाचित्र प्रदर्शनात प्रामुख्याने लावण्यात आले. त्यानंतर ते म्हणाले १५२६ पासून मुघल साम्राज्याचा भारतात विस्तार झाला त्याला प्रथम छत्रपती शिवाजी महाराजांनी १६४६ मध्ये तोरणा गड जिंकून लगाम लावला. त्यानंतर धर्मवीर संभाजी राजे , थोरले बाजीराव पेशवे यांच्या योगदानाने मराठा साम्राज्याचा इतिहास वाढत गेला. ब्रिटिश राजवटी विरुद्ध लढणारे चाफेकर बंधू , अनंत कान्हेरे , झारखंडचे बिरसा मुंडा , खुदीराम बोस , भगतसिंग , सुखदेव , चंद्रशेखर आझाद , मंगल पांडे , सुभाष चंद्र बोस , वासुदेव बळवंत फडके , बाजीप्रभू देशपांडे , लोकमान्य टिळक तसेच महिला क्रांतिकारक अहिल्यादेवी होळकर , राणी चेन्नमा ,राणी लक्ष्मीबाई , प्रीती लता वड्डेदार असे अनेक क्रांतिकारकांचे छायाचित्र प्रदर्शन लावण्यात आले.या कार्यक्रमाला भारतीय सेनेतील सेवानिवृत्त सुभेदार श्री जी .बी गवई तसेच सेवानिवृत्त श्री गोपाल चांगले यांची विशेष उपस्थिती लाभली.

# दादी प्रकाशमणी स्मृतिप्रित्यर्थ ब्रह्माकुमारीज द्वारा रक्तदान अभियान उत्साहात



**अकोला,दि २७ (प्रतिनिधी) :** प्रजापिता ब्रह्माकुमारीज द्वारा दादी प्रकाशमणीजी स्मृति पित्यर्थ आयोजित रक्तदान अभियान, अकोला शहरातील किर्तीनगर सेवाकेन्द्रा मध्ये शनिवार, दिनांक २३ ऑगष्ट रोजी मोठया उत्साहात सम्पन्न झाला. या मध्ये एकूण १२७ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

हया कार्यक्रमाचे आयोजन ब्रह्माकुमारीज च्या समाजसेवा प्रभागा अंतर्गत करण्यात आले होते. शिबीराच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. आरती कुलवाल, असि. डायरेक्टर हेल्थ सर्विसेस, श्री निलेशजी पांडे साहेब, पोलिस अधिक्षक व प्रिंसिपल पोलिस ट्रेनिंग सेंटर, अकोला, डॉ दिलीपजी सराटे, हेड ऑफ द डिपार्टमेंट, पॅथो. जी. एम. सी. कॉलेज अकोला, डॉ. प्रशांत थोरात सर प्रिंसिपल शिवाजी इंजिनियरिंग कॉलेज अकोला, डॉ सुवर्णा पाटील, असोसिएट प्रोफेसर जी. एम. सी. उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ब्रह्माकुमारी सुमन दीदी, रामदासपेठ सेवाकेन्द्र संचालिका होत्या. पाहुण्यांचे स्वागत बी. के. वर्षा दीदी ह्यांनी केले तर ईश्वरीय भेट वस्तु बी. के. वैशाली दीदी ह्यांनी दिली.ह्या प्रसंगी बोलतांना वक्त्यांनी श्रोत्यांना रक्तदानाचे महत्व पटवून दिले व कशा प्रकारे एका व्यक्तीच्या रकतदानाने रक्तातील वेगवेगळ्या घटकांद्वारे तीन व्यक्तींना जीवनादान मिळू शकते यावर प्रकाश टाकला. आपल्या अध्यक्षीय भाषणात बी. के. सुमन दीदी ह्यांनी म्हटले की ब्रह्माकुमारीज सदैव आपल्या वेगवेगळ्या प्रभागाद्वारे समाजाच्या विभिन्न घटकांकरिता नियमित समाजापयोगी कार्य करीत असते.

# अतिवृष्टीने शेतीचे नुकसान भरपाई देण्याची मागणी

**अकोला :** पातुर तहसील चे तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी मा राहुल वानखेडे साहेब पातुर यांनी कांग्रेस जिल्हा कांग्रेस कमेटी चे अध्यक्ष अशोक अमानकर साहेब व कांग्रेस नेता प्रकाश तायडे यांच्या प्रमुख उपस्थितीत निवेदन देणयात आले कीतालुक्यातील भेट दिली अस्ता आंधार सांगवी पांडुरंग चारोळी चोंडी नवेगाव कुंभारवाडी जाम पाचरण शेकापूर कारला सरंडी वसाली सावरगाव मरसूळ पांगर ताटी चा आणि चातारी सांगोला चरणगाव सस्ती विवरा अंबाशी आलेगाव या भागामध्ये मालेगाव रिसोड तालुक्यातील पाण्यामुळे नदीकाठच्या शेतीचे प्रचंड नुकसान झाले त्यामुळे या शेतांची सर्वेक्षण करून शेतांची सर्वेक्षण करून शेतकऱ्यांना उचित लाभ द्यावा या वेली निवेदन देवतानां तालुका कांग्रेस चे अध्यक्ष राजेश गावंडे, शहर कांग्रेस चे अध्यक्ष मुख्तार शेख उपस्थित होते.

RNINO-46973/1986 महासागर अकोला मालक,मुद्रक,प्रकाशक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर१-८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, कमला स्केअर, दुर्गा चौक,अकोला येथे प्रकाशित केले.
संपादक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१,९९२२९७००२३+स्थानिक संपादक **पुरुषोत्तम ढोले** फोन ९८८१४८९४७९+(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)





# कोलन कर्करोगाचा धोका दुप्पट

१९५० मध्ये जन्मलेल्या लोकांपेक्षा १९९० मध्ये जन्मलेल्या लोकांमध्ये कोलन कर्करोगाचा धोका दुप्पट झाला आहे. पूर्वी हा आजार ५० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या लोकांमध्ये जास्त दिसून येत होता. आता तरुणही बळी ठरत आहेत. जागतिक आरोग्य संघटनेच्या मते कोलन कर्करोग हा तिसरा सर्वात सामान्य कर्करोग आहे. जगातील कर्करोगाच्या मृत्यूचे हे दुसरे सर्वात मोठे कारण आहे. २०२० मध्ये कोलन कर्करोगाचे १९ लाखांहून अधिक नवीन रुग्ण नोंदवले गेले.

**कोलन कर्करोग म्हणजे काय?**

हा मोठ्या आतड्यात म्हणजेच कोलनमध्ये होणारा एक गंभीर आजार आहे. कोलन हा आपल्या पचनसंस्थेचा एक महत्त्वाचा भाग आहे, जो पचनानंतर अन्नाचा उरलेला भाग गुदाशयापर्यंत पोहोचवतो. कोलनच्या आतील थरात लहान गाठी तयार होऊ लागल्यावर हा कर्करोग सुरू होतो. त्याला 'पॉलिप्स' म्हणतात. हे 'पॉलिप्स' हळूहळू कर्करोगात बदलू शकतात. कोलन कर्करोगाची सुरुवातीची लक्षणे कधीकधी किरकोळ आजारांसारखी वाटतात. म्हणूनच लोक त्यांना गांभीर्याने घेत नाहीत. तथापि, ही लक्षणे समजून घेतल्याने जीव वाचू शकतो. शौचालय वापरताना विष्ठेत रक्त दिसले कवा टॉयलेट पेपरवर लाल खुणा दिसल्या तर सावधगिरी बाळगा. हे रक्त गडद लाल कवा चमकदार लाल असू शकते. ते




व्याधी विचार
डॉ. सतीश सोनवणे

मूळव्याधीमुळे देखील असू शकते; परंतु जर हे वारंवार होत असेल तर डॉक्टरांचा सल्ला घ्या. पोटात वारंवार वेदना कवा पेटके येत असतील आणि याचे नेमके कारण माहित नसेल, ही वेदना बराच काळ टिकत असेल कवा खूप तीव्र असेल तर त्याकडे दुर्लक्ष करू नका. खूप विश्रांती घेतल्यानंतरही थकवा जाणवत असेल, तर ते कोलोन कर्करोगाचे लक्षण असू शकते. तरुण लोक बहुतेकदा कामाचा ताण कवा झोपेचा अभाव असल्याचे गृहीत धरतात; परंतु ते कोलन कर्करोगाचे लक्षण असू शकते. वारंवार बद्धकोष्ठता किवा अतिसाराची तक्रार असेल. जर तुम्हाला पॉटीमध्ये जाण्याच्या सवयीत काही बदल जाणवत असेल आणि तो आठवडे टिकून राहिला तर तो चतेचा विषय आहे. पुरेसा आहार घेत असलात, तरीही तुमचे वजन वेगाने कमी होत असेल कवा तुम्हाला कमी भूक लागत असेल, तर हे देखील कोलन कर्करोगाचे लक्षण असू शकते.

**तरुणांमध्ये कोलन कर्करोग का वाढत आहे?**

गेल्या काही वर्षांमध्ये, २० ते ४९ वयोगटातील लोकांमध्ये कोलन कर्करोगाचे प्रमाण झपाट्याने वाढले आहे. दरवर्षी हे सुमारे १.५ टक्के दराने वाढत आहे. याचे नेमके कारण अद्याप माहीत नाही; परंतु काही गोष्टी यासाठी कारणीभूत असू शकतात. आजच्या जीवनात आपण तासनतास बसतो, व्यायाम करत नाही. त्यामुळे लठ्ठपणा वाढत आहे. या सर्वांमुळे कोलन कर्करोगाचा धोका वाढतो. जास्त प्रमाणात लाल मांस खाणे, सॉसेज, बर्गर आणि तळलेले अन्न यासारखे प्रक्रिया केलेले अन्न देखील याचे कारण असू शकते. मद्यपान आणि सिगारेट: धूम्रपान आणि जास्त प्रमाणात मद्यपान करणेदेखील या आजाराला आमंत्रण देते.

**कौटुंबिक इतिहास:**

पालकांना कवा भावंडांना हा आजार झाला असेल तर तुम्हालाही धोका असू शकतो. कोलन कर्करोगावर निदान सुरुवातीच्या टप्प्यात झाले तर उपचार शक्य आहे. शस्त्रक्रिया करुन कर्करोगाचा भाग शस्त्रक्रियेद्वारे काढून टाकला जातो. कर्करोगाच्या पेशी औषधांनी नष्ट केल्या जातात. रेडिएशन थेरपीद्वारे कर्करोग विशेष किरणांनी नष्ट केला जातो. तथापि, उपचारापेक्षा प्रतिबंध चांगला आहे.

# सुईचा वापर न करताही इंजेक्शन देता येणार

नवतंत्रज्ञान
कुंदन गायकवाड

आता सुईचा वापर न करता इंजेक्शन देणं शक्य झाले असून, वैद्यकीय क्षेत्रात हे तंत्रज्ञान क्रांती घडवणारे ठरू शकते. लहान मुलांना विशेषतः सुईची भीती वाटत असल्याने, त्यांच्यासाठी ही पद्धत वरदान ठरणार आहे.

'नीडल फ्री इंजेक्शन' या नावाने ओळखली जाणारी ही नवीन प्रणाली इंट्रामस्कुलर आणि सबक्युटिनस इंजेक्शनच्या बाबतीत प्रभावी ठरत आहे. या पद्धतीत सुईचा पूर्णतः वापर टाळला जातो. त्याऐवजी औषध त्वचेखाली पाठवण्यासाठी उच्च दाबाचा वापर केला जातो. औषध थेट स्नायूंमध्ये कवा त्वचेखाली पोहोचते. त्यामुळे वेदना कमी होतात, सूज येत नाही आणि संसर्गाचा धोका कमी होतो.

**लहान मुलांमधील सुईची भीती नाहीशी होणार**

सुईची भीती असणाऱ्यांसाठी, विशेषतः लहान मुलांसाठी ही पद्धत अत्यंत उपयुक्त ठरते. इन्सुलिन, लसीकरण, डायलिसिससारख्या उपचारांत याचा वापर वाढतो आहे. यामुळे वेळेची बचत, सुरक्षितता आणि रुग्णांचा अनुभव अधिक सकारात्मक होतो.

नव्या तंत्रज्ञानामुळे संसर्गा



ही 'जेट इंड्यूस्ड' तंत्रज्ञानावर आधारित प्रणाली असून, उच्च दाबामुळे औषध तब्बल ४ सेंटीमीटरपर्यंत आत शरीरात प्रवेश करते. यामध्ये सुईचाच वापर टाळल्यामुळे न केवळ टिश्यू डॅमेज होत नाही, तर आरोग्य सेवक व रुग्ण यांना संसर्ग होण्याचा धोका टळतो.

कोणते इंजेक्शन नव्या पद्धतीने देता येणार नाही?

भारतमध्ये सहा महिन्यांपेक्षा अधिक वयाच्या मुलांवर या प्रणालीची चाचणी यशस्वीपणे पार पडली आहे. या माध्यमातून लिक्विड बेस इंजेक्शन आणि सर्व प्रकारची लस देता येते. लहान मुलांपासून ते प्रौढांपर्यंत याचा उपयोग होऊ शकतो; मात्र ऑइल बेस्ड इंजेक्शन या तंत्राने देणं सध्या शक्य नाही.

# योग निद्रा ठरेल प्रभावी

मात्रा आयुर्वेदाची

शांत, निवांत झोप प्रत्येकालाच हवी असते. पण सध्याच्या धकाधकीच्या जीवनात अशी झोप मिळतेच असं नाही. अपुऱ्या झोपेमुळे आरोग्य बिघडतं. खूप चिडचिड होते. योग निद्रेमुळे तुम्ही शांत झोपेची अनुभूती घेऊ शकता.

* अपुऱ्या झोपेमुळे रोगप्रतिकारक शक्ती कमी होते. नैराश्य येतं. मानसिक आरोग्यावर परिणाम होतो. मात्र रात्री योग निद्रा केल्यामुळे शांत झोप लागू शकते.

* योगनिद्रेमुळे ताण कमी व्हायला मदत होते. योगनिद्रेमध्ये आपल्याला शरीरातल्या लहरींची जाणीव होते. यामुळे विविध मानसिक आजार बरे होऊ शकतात, ही बाब एका संशोधनातून समोर आली आहे. 'इंटरनॅशनल जर्नल ऑफ योगा'मध्ये हा शोध प्रसिद्ध झाला आहे.



* योगनिद्रेदरम्यान शरीराला निवांतपणा लाभतो. या काळात शरीराची झीज भरून निघू शकते. यामुळे रोगप्रतिकारक क्षमता सुधारते. दाह कमी होतो.

* योगनिद्रेमुळे मधुमेहाचा सामना करता येतो. यामुळे रक्तातल्या साखरेचं प्रमाण नियंत्रित राहतं. मधुमेहींना खूप उत्साही वाटतं. त्यामुळे मधुमेहींनी योगनिद्रा करायला हवी.

* आयुष्यात घडलेल्या दु:खद प्रसंगांमुळे अनेकांना धक्का बसतो. योगनिद्रेमुळे या धक्क्याची तीव्रता कमी होऊ शकते.

* योगनिद्रेमुळे आपण आपल्या आत्म्याशी थेट जोडले जातो. आपण आपल्या आत डोकावून बघू शकतो. नकारात्मक विचारांचा प्रभाव कमी होतो. शरीरात सकारात्मक ऊर्जेचा संचार होऊ लागतो.

# फॅटी लिव्हरच्या प्रमाणात वाढ

फॅटी लिव्हर या आजाराला 'मेटाबॉलिक डिसफंक्शन असोसिएटेड फॅटी लिव्हर डिसीज' (एमएएफएलडी) म्हणतात, ज्याला पूर्वी 'नॉन-अल्कोहोलिक फॅटी लिव्हर डिसीज' (एनएएफएलडी) म्हटले जात असे. जेव्हा यकृतामध्ये जास्त चरबी जमा होते, तेव्हा हा आजार होतो. तो लठ्ठपणा, मधुमेह आणि उच्च कोलेस्ट्रॉलसारख्या आजारांशी संबंधित आहे. अलिकडेच आरोग्यमंत्र्यांनी सांगितले की राष्ट्रीय नॉन-कम्युनिकेबल डिसीज कंट्रोल प्रोग्रामअंतर्गत, फॅटी लिव्हर रोखण्यासाठी आणि व्यवस्थापित करण्यासाठी निरोगी खाणे, दररोज व्यायाम, वजन नियंत्रण आणि जास्त साखर आणि चरबी टाळणे आवश्यक असल्याचे वर्णन केले आहे.



आरोग्य वार्ता
डॉ. प्रसन्ननेने

राज्यांना सांगण्यात आले आहे, की डॉक्टरांनी मार्गदर्शक तत्त्वांनुसार तपासणी करावी आणि गरज पडल्यास रुग्णाला योग्य उपचार द्यावेत.

पहिला अभ्यास २०२५ मध्ये 'नेचर सायंटिफिक रिपोर्ट्स जर्नल'मध्ये प्रकाशित झाला होता. त्यात हैदराबादच्या ३४५ आयटी कर्मचाऱ्यांचा समावेश होता. अहवालात असे आढळून आले, की ३४ टक्के कर्मचाऱ्यांना मेटाबॉलिक सड्रोम होता आणि ८४ टक्के कर्मचाऱ्यांच्या यकृतात चरबी होती. म्हणजेच आयटी क्षेत्रात ही समस्या खूप सामान्य आहे. दुसरा अभ्यास 'आयसीएमआर'ने केला होता. यामध्ये राजस्थानातील अनेक गावांमध्ये यकृत रोग, मधुमेह आणि रक्तदाबाचा धोका दिसून आला. असे आढळून आले, की सुमारे ३७ टक्के लोकांना फॅटी लिव्हर आहे आणि ही समस्या पुरुषांमध्ये जास्त आहे.

# हात, पाय बधीर होतात?

हात कवा पाय सुन्न झाले आहेत? कोणीतरी तुम्हाला चिमटा काढला आहे; पण तुम्हाला ते जाणवत नाही. काही क्षणांनंतर तुम्हाला मुंग्या येणे कवा सुईसारखे वेदना जाणवतात. हे कधीकधी सामान्य असू शकते; परंतु जर ही समस्या वारंवार होत असेल, तर ते तुमच्या शरीरात काही आवश्यक पोषक तत्वांच्या कमतरतेचे लक्षण असू शकते. हात आणि पाय वारंवार सुन्न होणे हे केवळ थकवा कवा चुकीच्या आसनामुळेच नाही, तर ते व्हिटॅमिन बी १२ च्या कमतरतेचे लक्षणदेखील असू शकते. व्हिटॅमिन बी १२ च्या कमतरतेचा शरीरावर कसा परिणाम होतो आणि ते कसे टाळता येईल ते जाणून घ्या.

**व्हिटॅमिन बी १२ ची कमतरता का होते?**



आरोग्यमंत्र
डॉ. अजिंक्य बोऱ्हाडे

व्हिटॅमिन बी १२ हे एक आवश्यक पोषक तत्व आहे, जे शरीराला लाल रक्तपेशी, मज्जासंस्था योग्यरित्या कार्य करण्यास मदत करते. शुद्ध शाकाहारी लोकांमध्ये त्याची कमतरता अधिक सामान्य आहे, कारण बी १२ चे मुख्य स्रोत मांस, अंडी, मासे आणि दुग्धजन्य पदार्थ आहेत. हात आणि पायांमध्ये मुंग्या येणे कवा सुन्न होणे, थकवा आणि अशक्तपणा स्मरणशक्ती कमी होणे, चक्कर येणे नैराश्य कवा मूड स्विंग्स जीभेला सूज येणे कवा तोंडात व्रण येणे ही त्याची लक्षणे आहेत.

**यावर उपाय काय आहे?**

आहारात अंडी, दूध, दही, चीज, मासे, चिकन इत्यादींचा समावेश करा. जर तुम्ही शुद्ध शाकाहारी असाल, तर डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार बी१२ सप्लिमेंट्स घ्या. गंभीर प्रकरणांमध्ये, डॉक्टर व्हिटॅमिन बी१२ च्या इंजेक्शन्स कवा टॅब्लेटच्या स्वरूपात सप्लिमेंट्स घेण्याची शिफारस करू शकतात. वेळोवेळी रक्त तपासणी करून बी१२ ची पातळी तपासणे महत्वाचे आहे. हात आणि पायांमध्ये वारंवार सुन्नपणा कवा मुंग्या येणे ही एक सामान्य समस्या वाटू शकते; परंतु त्यामागील कारण गंभीर असू शकते. व्हिटॅमिन बी१२ ची कमतरता केवळ नसा खराब करत नाही, तर तुमच्या एकूण आरोग्यावरही परिणाम करते.

# महत्त्व डाळींचं

काय खावं?

डाळींमधून भरपूर प्रथिनं मिळतात. शाकाहारींसाठी डाळी हा प्रथिनांचा मुख्य स्रोत मानला जातो. डाळींमध्ये प्रथिनांसोबतच इतरही पोषक घटक असतात. म्हणूनच रोजच्या आहारात डाळींचा समावेश करायला हवा. विविध प्रकारच्या डाळी खायला हव्यात. डाळींमुळे शरीराला होणाऱ्या लाभांविषयी...



* डाळींमध्ये प्रथिनांसोबतच लोह आणि फोलेट नावाचा घटक असतो. वजन कमी करण्यासोबतच स्नायूंच्या बांधणीसाठी प्रथिनांची गरज असते. डाळींमधून ही प्रथिनं मुबलक प्रमाणात मिळू शकतात.


* डाळींमध्ये पॉलिफेनॉल्स हा घटक असतो. यात अँटी ऑक्सिडंट्स आणि दाह कमी करणारे गुण असतात. यामुळे फ्री रॅडिकल्समुळे झालेलं नुकसान भरून निघायला मदत होते.

* डाळींमुळे हृदयाचं आरोग्य चांगलं रहातं. डाळीत उच्च रक्तदाबावर नियंत्रण मिळवण्यासोबत कोलेस्टरॉल कमी करणारे गुणधर्मही असतात.

* डाळ भात हा परिपूर्ण असा आहार आहे. डाळ भात खाल्ल्यामुळे शरीराला आवश्यक ती अमिनो ॲसिड्स मिळतात.

# झोप येत नाही? या युक्त्या वापरा

तुम्ही रात्री अंथरुणावर झोपून फक्त विचार करत राहता का? ही एक सामान्य पद्धत आहे; पण त्यामुळे तुमच्या झोपेत व्यत्यय येतो. तुमच्या झोपेची गुणवत्ता सुधारण्यासाठी आणि रात्री जास्त विचार करणे टाळण्यासाठी, तुम्ही काही युक्त्या वापरू शकता. रात्री जास्त विचार करणे टाळण्याचे ९ सोपे आणि प्रभावी मार्ग आहेत.



स्मार्ट टिप्स
डॉ. मेघा दळे

**मेंदूचा त्रास:**

झोपण्यापूर्वी, एक वही आणि पेन घ्या. तुमच्या मनात काय चालले आहे ते लिहा, जसे की चता, अपूर्ण कामे, भावना आदी. हे तुमचे मन स्वच्छ करण्यास आणि गोष्टी व्यवस्थित करण्यास मदत करते, जेणेकरून तुम्ही आरामात झोपू शकाल.

**नियंत्रित श्वास:**

खोल श्वास घेण्याच्या तंत्रांमुळे तुमची मज्जासंस्था शांत होते. तुम्ही ४-७-८ तंत्र वापरून पाहू शकता. ४ सेकंदांसाठी नाकातून श्वास घ्या, ७ सेकंदांसाठी श्वास रोखून ठेवा आणि ८ सेकंदांसाठी तोंडातून श्वास सोडा. हे तुमचे मन शांत करेल.

**प्रोग्रेसिव्ह स्नायू विश्रांती:**

तुमच्या शरीरातील वेगवेगळ्या स्नायू गटांना हळूहळू घट्ट करा आणि नंतर त्यांना आराम द्या. तुमच्या पायांपासून सुरुवात करा आणि वरच्या दिशेने हालचाल करा. यामुळे शरीराचा ताण कमी होतो आणि विश्रांती वाढते.

**कृतज्ञता जर्नल:**

झोपण्यापूर्वी तुम्ही ज्या तीन गोष्टींसाठी कृतज्ञ आहात त्या लिहा. यामुळे तुमचे लक्ष सकारात्मक गोष्टींकडे वळते आणि नकारात्मक विचार कमी होण्यास मदत होते.

**स्क्रीन टाइम कमी करा:**

झोपण्यापूर्वी किमान एक तास आधी तुमचा फोन, टॅबलेट आणि संगणक वापरणे थांबवा. स्क्रीनमधून निघणारा निळा प्रकाश तुमच्या झोपेच्या चक्रात व्यत्यय आणू शकतो.

**नियमित झोपेचे वेळापत्रक:**

दररोज झोपायला जा आणि त्याच वेळी उठा, अगदी आठवड्याच्या शेवटीही. हे तुमच्या शरीराचे अंतर्गत घड्याळ सेट करण्यास मदत करते, जे तुम्हाला चांगली झोप घेण्यास मदत करते.

**शांत वातावरण:**

तुमची बेडरूम शांत, गडद आणि थंड ठेवा. यामुळे झोपेसाठी आरामदायी वातावरण तयार होते.

**कॅफिन आणि अल्कोहोल टाळा:**

झोपेच्या काही तास आधी कॅफिन (चहा, कॉफी) आणि अल्कोहोल टाळा, कारण हे दोन्ही तुमच्या झोपेत व्यत्यय आणू शकतात.

**सकारात्मक स्व-बोलणे:**

स्वतःशी सकारात्मक बोला. स्वतःला आठवण करून द्या की तुम्ही सुरक्षित आहात आणि तुम्ही आरामात झोपू शकता.

# मासिक पाळी पुढे ढकलताय?

सण, समारंभ, पर्यटन कवा धार्मिक कार्याच्या आड येणारी मासिक पाळी पुढे ढकलण्याचा निर्णय अनेक महिला घेतात. मात्र अशा प्रकारे निसर्गचक्रात हस्तक्षेप करणं चुकीचं आहे. बरंच प्रबोधन होऊनही मासिक पाळीबाबतचे गैरसमज कमी झालेले नाहीत. म्हणूनच महिलांना कृत्रिम पद्धतीने पाळी पुढे ढकलावी लागते. मासिक पाळी पुढे ढकलण्यासाठी गोळ्या घेतल्या जातात. पण या गोळ्यांचे शरीरावर दीर्घकालीन परिणाम होतात.

* मासिक पाळी पुढे ढकलणाऱ्या गोळ्यांच्या सततच्या सेवनामुळे या संदर्भातल्या नैसर्गिक चक्रावर परिणाम होऊ शकतो. शिवाय महिलांच्या प्रजननक्षमतेवरही याचे घातक परिणाम दिसून येतात.

* या गोळ्यांचं सेवन केल्यानंतर पुढचा काही काळ मासिक पाळीदरम्यान मोठ्या प्रमाणावर रक्तस्राव होण्याची शक्यता वाढते. जवळपास २० टक्के महिलांना हा अनुभव येतो. पुढचे काही महिने मासिक पाळीतून अधिक प्रमाणात रक्त जाऊ शकतं.

* या गोळ्या बऱ्याच काळपर्यंत घेत राहिल्यास आरोग्यावर अत्यंत घातक असे परिणाम दिसून येतात. नसांमध्ये रक्ताची गुठळी होण्यासारख्या समस्या जाणवू शकतात. या गोळ्यांमुळे इतर औषधांच्या शरीरावरच्या प्रभावावर विपरित परिणाम होऊ शकतो.



कुठे चुकतो आपण?

* या गोळ्या घेतल्यानंतर इतर काही दुष्परिणाम होऊ शकतात. जुलाब, हातापायांमध्ये गोळे येणं, अवेळी रक्तस्राव होणं हे दुष्परिणाम दिसून येऊ शकतात.

नवसंशोधन

## एकटे आहात...



एकटं असणं आपल्या मानसिक आरोग्यासाठी खूप चांगलं असतं. एका संशोधनातून ही बाब समोर आली आहे. एकटं राहिल्यामुळे फक्त मानसिकच नाही तर शारीरिक आरोग्यही चांगलं राहतं. नातेसंबंधांशी संबंधित बरीच संशोधनं होत असतात. असंच एक संशोधन मध्यंतरी झालं होतं. कॅलिफोर्निया विद्यापीठात हे संशोधन करण्यात आलं होतं. एकटे लोक विवाहित कवा रिलेशनशीपमध्ये असणाऱ्यांपेक्षा अधिक निरोगी असतात, ही बाब या संशोधनातून समोर आली होती. दुसऱ्या एका संशोधनातूनही ही बाब समोर आली आहे. त्यामुळे एकटं असणाऱ्यांनी घाबरण्याचं काहीच कारण नाही.

फूटकेअर

## योग्य पादत्राणं निवडा

चुकीच्या पादत्राणांमुळे पाठीचा कणा तसंच पायांना दुखापत होऊ शकते. मात्र याकडे आपण कधीही लक्ष देत नाही. चुकीच्या पद्धतीने चालल्यामुळे आपल्या पायांचा आकारही बदलू शकतो. त्यामुळे पादत्राणं घेताना फॅशनऐवजी आरोग्याचा विचार करणं गरजेचं आहे. उंच टाचेच्या चपलांमुळे नसांवर ताण येतो. या पादत्राणांमुळे तुम्ही उंच दिसत असलात तरी यामुळे गुडघेदुखी, आर्थ्रायटिस तसंच पायांचं दुखणं मागे लागू शकतं. त्यामुळे योग्य प्रकारच्या पादत्राणांचा वापर करा.



काळजी त्वचेची

## निरोगीत्वचेसाठी...



निरोगी, नितळ त्वचा हे प्रत्येक महिलेचं स्वप्न असतं. चुकीचा आहार, प्रदूषण, रसायनांचा वापर यामुळे त्वचेतला तजेला कमी होतो. पोषक आहार, व्यायाम तसंच नैसर्गिक उत्पादनांचा वापर करून तुम्ही त्वचेचं आरोग्य टिकवून ठेऊ शकता. यासोबतच काही चुकाही टाळल्या पाहिजेत. बॉडी लोशन चेहऱ्याला लावू नका. बॉडी लोशनमध्ये तेलाचं प्रमाण अधिक असतं. चेहऱ्याला एवढ्या तेलाची गरज नसते. त्यामुळे बॉडी लोशनऐवजी चेहऱ्यासाठी तयार करण्यात आलेलं क्रीम लावा. अंड्याचा पांढरा भाग चेहऱ्याला लावला जातो. पण अंड्याची ॲलर्जी असल्यास या पांढऱ्या भागाचा वापर करू नये.

आजीबाईचा बटवा

## संत्र्याच्या बिया लाभदायी



संत्र्याच्या सालींबद्दल आपण ऐकलं आहे. पण संत्र्याच्या बियांचं काय, त्या तर फेकून दिल्या जातात.वास्तविक त्यांच्या सेवनाने वजन कमी व्हायलाही मदत होते. संत्र्याच्या बियांमुळे उच्च रक्तदाब नियंत्रणात राहतो. 'बी ६' हे जीवनसत्त्व आणि मॅग्नेशियममुळे संत्र्याचं बी प्रभावी ठरतं. संत्र्याच्या बियांपासून निघणारं तेल केसांसाठी पोषक असतं. ते तेल उत्तम कंडिशनर म्हणून काम करतं. या बियांमध्ये अँटीऑक्सिडंट्स भरपूर प्रमाणात असतात. म्हणूनच मग रोप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी संत्र्याच्या बियांचं सेवन करता येईल.

# भामरागडला पुन्हा पुराचा तडाखा

■ महासागर प्रतिनिधी
गडचिरोली, दि. २७ :



भामरागड तालुक्यातील हिंदेवाडा येथील गर्भवती महिला अर्चना विकास तिम्मा हिला २७ ऑगस्ट रोजी पहाटे ४.०० वाजता राज्य आपत्ती प्रतिसाद दलाच्या (एसडीआरएफ) पथकाच्या मदतीने पामूलगौतम नदीच्या पुरातून सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले. नदी पार करून तिला तातडीने भामरागड ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले असून सकाळी तिने गोंडस कन्येला जन्म दिला आहे.

छत्तीसगड राज्यात मागील दोन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे इंद्रावती, पर्लकोटा व पामूलगौतम नद्यांच्या पातळीत वाढ झाली आहे. यामुळे भामरागड परिसरात पूरस्थिती निर्माण झाली. जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा यांनी कालच याची दखल घेऊन आपत्ती व्यवस्थापनाची यंत्रणा सज्ज ठेवण्याचे आदेश दिले होते.

त्यानुसार सिरोंचा येथून एसडीआरएफचे पथक रात्री अकरा वाजता भामरागडला रवाना झाले. पहाटे चारच्या सुमारास पथकाने अर्चनाला पुरातून बाहेर काढून रुग्णालयात दाखल केले. या जलद कारवाईमुळे प्रसूतीवेळी होणारा मोठा अनर्थ टळला, असे तहसीलदार किशोर बागडे यांनी सांगितले.

दरम्यान, भामरागडच्या मुख्य बाजारपेठेत पर्लकोटा नदीचे पाणी शिरले. तब्बल ३० ते ३५ दुकानांत पाणी गेल्याने व्यापारी हवालदिल झाले होते. मात्र पूर्वसूचनेमुळे व्यापाऱ्यांनी कालच आपले साहित्य सुरक्षित स्थळी हलवले. त्यामुळे मोठे नुकसान टळले.

**तिसऱ्यांदा पुराचा फटका**

यंदा दक्षिण गडचिरोलीला पावसाचा सर्वाधिक फटका बसला आहे. त्यामुळे भामरागडचा महिनाभरात तिसऱ्यांदा संपर्क तुटला असून शहरात पाणी गेल्याने पूर प्रवण क्षेत्रातील घरांना आणि दुकानांना रिकामे करावे लागले. त्यामुळे संबंधितांना मोठ्या प्रमाणात आर्थिक फटका बसला आहे.

प्रशासनाने आधीच आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सज्ज ठेवून तत्काळ कारवाई सुरू केल्याने नुकसान मर्यादित राहिले, असे स्थानिकांचे मत आहे.

पावसाचा जोर अजूनही कायम असल्याने प्रशासनाने सर्व विभागांना सज्ज राहण्याचे आदेश दिले आहेत.

विशेषतः आरोग्य विभाग, महसूल, पोलीस आणि आपत्ती व्यवस्थापन शाखांना तातडीच्या उपाययोजना करण्यास सांगण्यात आले आहे. नागरिकांनीही नदीकाठी किंवा धोक्याच्या भागात जाऊ नये, सतर्क राहावे असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# शिंदेंचे जरांगेंना चर्चेचे आवाहन

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २७ :



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठा आरक्षणासाठी मुंबईच्या दिशेने निघालेल्या मनोज जरांगे पाटील यांना चर्चेचे आवाहन केले आहे. महाराष्ट्रात यापूर्वी अनेकदा मोठी आंदोलने झाली. पण सर्वांनी आपल्या आंदोलनाचा इतरांना त्रास होणार नाही याची काळजी घेतली. त्यामुळे मनोज जरांगे व त्यांच्या सहकाऱ्यांनीही गणेशभक्तींची गैरसोय होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. त्यांनी चर्चेच्या माध्यमातून आपल्या मागण्या मांडाव्या, असे ते म्हणालेत.

मनोज जरांगे बुधवारी सकाळी आपल्या लाखो समर्थकांसह मुंबईच्या दिशेने निघालेत. ते मराठा आरक्षणाच्या आपल्या प्रमुख मागणीसाठी मुंबईच्या आझाद मैदानावर आंदोलन करणार आहे. ऐन गणेशोत्सवात हे आंदोलन सुरू झाल्यामुळे सरकारची काळजी वाढली आहे.

या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मनोज जरांगे यांना चचेर्चे आवाहन केले आहे. ते बुधवारी दुपारी पत्रकारांशी संवाद साधताना म्हणाले, लोकशाहीमध्ये आंदोलन करण्याचा व आपला हक्क मागण्याचा अधिकार आहे. पण आपल्या आंदोलनामुळे इतरांची गैरसोय होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे.

मी मुख्यमंत्री होतो तेव्हा आमच्या मंत्रिमंडळाने मराठा समाजाला १० टक्के आरक्षण देण्याचा निर्णय घेतला होता. मी जाहीरपणे शिवरायांच्या पायांची शपथ घेऊन आरक्षण देण्याची शपथ घेतली होती. त्यानुसार हे आरक्षण दिले होते.

हे आरक्षण आजही कायम आहे. त्यामुळे मराठा समाजासाठी कुणबी प्रमाणपत्र देणे असो, विविध योजना लागू करणे असो किंवा जस्टीस शिंदे समिती असेल, गायकवाड समिती असेल, मागासवर्ग आयोग असेल आमच्या सरकारने विविध माध्यमांतून अनेक गोष्टी देण्याचे काम केले होते. गणपती उत्सवानिमित्त देशविदेशातून लाखो गणेशभक्त महाराष्ट्रात विशेषतः मुंबईत येत असतात. त्यांची कुठेही गैरसोय होऊ नये ही माझी भावना आहे. याचे भान व काळजी प्रत्येकाने घेतली पाहिजे. त्यामुळे सरकारने मनोज जरांगे यांना चर्चा करून प्रश्न सोडविण्याचे आवाहन केल्याचे शिंदे म्हणाले.

# ताडोबातील छोटा मटका गंभीर

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २७ :

ताडोबा-अंधारी व्याघ्रप्रकल्पाच्या बफर क्षेत्रातील छोटा मटका नावाने प्रसिद्ध वाघाची प्रकृती सातत्याने ढासळत असतानाही व्यवस्थापनाकडून उपचारासाठी ठोस पाऊल उचलण्यात आले नाही. परिणामी, या वाघाला आता चालणेही कठीण झाले आहे. या वाघाच्या उपचारासाठी वनखात्याकडून टाळाटाळ होत आहे.



ताडोबा-अंधारी व्याघ्रप्रकल्पाच्या बफर क्षेत्रातील छोटा मटका नावाने प्रसिद्ध वाघाची प्रकृती सातत्याने ढासळत असतानाही वनखात्याकडून उपचाराबाबत उपाययोजना करण्यात येत नसल्याने आता स्वतः उच्च न्यायालयाने दखल घेतली आहे.

ताडोबा-अंधारी व्याघ्रप्रकल्पाच्या गाभा क्षेत्रातील दिग्गज वाघ मटकासूर आणि वाघीण छोटी तारा यांच्या पोटी २०१६च्या अखेरीस छोटा मटकाचा जन्म झाला. ताराचंद नावाचा त्याला एक भाऊ होता, जो वीज पडून मृत्युमुखी पडला. छोटी ताराने त्याला वाढवले आणि तो धाडसी वाघ बनला.

ताडोबाच्या बफर क्षेत्रात साम्राज्य निर्माण करणाऱ्या या वाघाची बुद्धपौर्णिमेच्या दिवशी ब्रह्मा या वाघासोबत लढाई झाली. यात ब्रह्मा ठार झाला तर छोटा मटका रक्तबंबाळ झाला. त्याच्या पायाला मोठ्या चिरा पडल्या आणि त्यात सातत्याने रक्त येत होते. त्याला चालणे कठीण होत असतानाही व्यवस्थापनाने त्याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप आहे. त्याच्यावर प्राथमिक उपचार करण्यात आले. मात्र, प्रकृतीत सुधारणा झाली नाही.

आता पायाची जखम अधिक चिघळली असून चालणे कठीण झाले आहे. हा वाघ नैसर्गिकरित्या बरा होईल, या अपेक्षेने वनविभाग हातावर हात ठेवून बसून आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने या प्रकरणाची गंभीर दखल घेत ॲड. यश सांबरे यांची न्यायालयीन मित्र म्हणून नेमणूक करीत स्वतःहून याचिका दाखल करून घेतली. या याचिकेवर पुढील आठवड्यात सुनावणी होणार असल्याची माहिती पुढे आली आहे.

# जीवंत सातबारा अभियान मोहिमेला फासला हरताळ

## आमगावात अद्यापही १०३ मृतकांची नावे सातबारावर कायम : शासनाला दिशाभूल करणारी खोटी

■ महासागर प्रतिनिधी, देसाईगंज, दि. २७ :

महसूल विभाग १०० दिवस कृती कार्यक्रम आराखडा अंतर्गत दिनांक ०१ मार्च २०२५ पासुन बुलढाणा जिल्हयातील सर्व गावांमध्ये जिवंत सातबारा मोहिम राबविण्यात आली होते. सदर मोहिमेची शासनस्तरावर महसूल मंत्र्यांनी दखल घेवून सदर मोहिम संपुर्ण राज्यामध्ये राबविण्याबाबत्त निर्देश दिलेले होते.

त्यानुसार महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागाने १९/३/२०२५ ला जिवंत सातबारा अभियान मोहीम राबविण्यासाठी शासन परिपत्रक निर्गमित केले होते. मात्र गडचिरोली जिल्ह्यातील देसाईगंज तालुक्यातील आमगाव साजामध्ये एक नव्हे तब्बल एकशे तीन मयतांचे नांव सातबारावर कायम असल्याची धक्कादायक माहिती उघडकीस आली असल्याने महसुल विभागात एकच खळबळ उडाली आहे.

१ एप्रिल ते ५ एप्रिल पर्यंत ग्राम महसूल अधिकारी यांनी त्यांच्या साजा अंतर्गत येणाऱ्या गावांमध्ये चावडी वाचन करून न्यायप्रविष्ट प्रकरणं सोडून गावं निहाय मयत खातेदार यांची यादी तयार करणं,६ एप्रिल ते २० एप्रिल या कालावधीत वारसांनासंबंधी आवश्यक कागदपत्रे सादर करून मंडळ अधिकारी यांचे मार्फत वारस ठराव ई फेरफार प्रणालीद्वारे मंजूर करणे, २१ एप्रिल ते १० मे या कालावधीत ७/१२ दुरुस्ती करुन सर्व जीवंत व्यक्ती ७/१२ वर नोंदविलेल्या असायला पाहिजे होते.

यात समन्वयक अधिकारी म्हणून तहसीलदार हे आपल्या अधिनस्त क्षेत्रात हा कालबद्ध कार्यक्रम विहित मुदतीत पूर्ण करण्यासाठी ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी यांना अवगत करण्यात येऊन सदर कारवाई करण्याबाबत सक्त सुचना देण्याचे निर्देश शासन परिपत्रकात देण्यात आले होते.

मात्र देसाईगंज तालुक्यातील आमगाव साझातील माहीती जिल्हाधिकारी कार्यालयास खोटी माहिती देऊन जवळपास शंभर पेक्षा जास्त अर्थात १०३ मयतांचे नांव सातबारा उतारा मध्ये अद्यापही कायम आहेत.

यामुळे शासनाच्या जीवंत सातबारा या अभिनव उपक्रमाला तहसीलदार, नायब तहसीलदार, मंडळ अधिकारी व तलाठी आमगाव यांनी अक्षरशः हरताळ फासला आहे. ही बाब वरिष्ठांपासून पुर्णतः लपविण्यात आल्याचे सांगितले जाते.

जिल्हाधिकारी गडचिरोली यांच्यासह शासनापासून लपवून ठेवली असल्याने शासनाला खोटी व दिशाभूल करणारी माहिती दिल्याबद्दल संबंधित तहसीलदार देसाईगंज तलाठी आमगाव व मंडळ अधिकारी देसाईगंज यांच्यावर काय कारवाई होते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

जिवंत सातबारा मोहिम अंतर्गत सातबारावरील गावातील सर्व मयत खातेदारांच्या वारसांच्या नोंदीची प्रक्रिया पूर्ण करावयाची आहे.

मयत खातेदार यांच्या वारसांना शेतजमिनीच्या अनुषंगाने विविध दैनंदिन कामकाजासाठी आवश्यक असणाऱ्या कागदपत्रामध्ये वारसांची नोंद विहित कालावधीत अधिकार अभिलेखामध्ये नोंद न झाल्याने अडचणींना सामोरे जावे लागते.

संपूर्ण राज्यात जिवंत सातबारा मोहिम राबविण्याचा निर्णय शासनस्तरावर घेण्यात आला असला तरी यापूर्वी वारसान फेरफारतून हजारो रुपये मिळत होते, मात्र या अभिनव उपक्रमातून स्थानिक पातळीवरील अधिकाऱ्यांना चिरीमिरी मिळत नसल्याने भ्रष्ट व भोंगळ कारभारामुळे सदर योजना लालफितीत चांगलीच फसली असल्याचे सांगितले जात आहे. या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी





